# समरसता

साहित्य पत्रिका

वर्ष ६, अंक १२, ऑगस्ट २०२६






**घननिळा मेघदूत**
(कालिदासाच्या 'मेघदूत' या खंडकाव्यातील
यक्षाच्या भावना.)

घननिळे आभाळ ऐसे सावळ्या परि जाहले
का तयाचे हृदय दु:खी माझ्या परी विरही जाहले?
आर्तता माझ्या मनाची
जा तिला सांगून ये
कमलमुखी कोमेजली अन् नेत्र तिचे पाणावले...

हे नभा, जा सांग प्रियेला
आर्तता माझ्या हृदयीची
आठ महिने विरहाग्नीने या
थंड वारे पोळले...

ही सुगंधी अत्तरापरी
रंग वर्णी पाहुनी सुमने
आठवे चेहरा तिचा
मन वेदनांनी हासले...

उत्तरेच्या उज्जैनीला
गवसणी घालून येता
सुवर्णमंडीत रत्नमंडित
कुबेराघरी ने पावले...

घेऊनी सुमने मोजुनी ती
पाहते रे वाट माझी
नेत्र तिचे हरिणीपरी लोभस
आसवांनी लाल झाले...

ज्या ठिकाणी बारमाही सोहळा हा
सहा ऋतूंचा त्या ठिकाणी दु:ख
नव्हते, सुख नशिबा बोचले...

स्फटिकांनी रत्नमंडित
झोका जेथे घेई मयूर
आतुर तिथेही यक्षप्रिया
अन् फितूर सारी वादळे...

अवंती नगरीत या
पानांवरी दवांचे शहारे
मोतीयाचा बहर भूवरी
रत्नकांचन सोहळे...
हे नभा, तव रंग पाहुनी
आठवे काजळ प्रियेचे
स्फुंदताना डोळ्यातूनी
आषाढ घन तिने गाळले...

या आषाढाच्या दिनी होते
भेट धरणी पावसाची
पाहुनी त्या आर्त भेटी
काळीज माझे फाटले...

**प्रा. डॉ. सौ. दुर्गा गंगाधर जोशी**

**सगुण म्हणू की निर्गुण रेऽऽ**
हे भास म्हणू की
नि:श्वास कुणा संताचे,
साकार होतसे
रूप समोर सगुणाचे..

हे कोण उगाळिते
चंदन सहाणपाठीवर,
अन् गंध लावते
कोण भाळी मांगल्याचे...

निघे धूर सुदुरसा
धुम्र रेषा आकाशात,
कळसावर करड्या
ध्यान कुणा पक्षाचे...

हे राऊळ देवाचे
की रानात तपस्वी उभा,
घालिता प्रदक्षिणा
वाढतसे पुण्य नदीचे...

वाटतो तुझा रे ध्यास
आसपास रहिवास,
ना फुले ऊद गाभारी
तरी राज्य गंधाचे...

**अशोक सोनावणे**

----

रात्र लागली सूर्य गिळू
जागण्याची आली वेळ,
नको झाकूस पापण्या
दूर कर आता झाकोळ.

ताकदवान असे मित्रा
तारुण्याचा उंबरठा,
जागा कर आता आतले
ज्वालामुखीचा तू साठा.

उचलून आता गोवर्धन
तुझा तुच हो कृष्ण,
वेदनेने ओघळले ते
डोळ्यातून अश्रू कोष्ण.

चालण्यास मिळे बळ
हातामध्ये असोत हात,
काट्यातून फुटे वाट
जिद्दीने करशील मात.

**डॉ. राजेंद्र माने**

# समरसता
साहित्य पत्रिका

**वर्ष ६, अंक १२, ऑगस्ट २०२६**

**संपादक**
रवींद्र गोळे

**संपादक मंडळ**
प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे
डॉ. रमा गर्गे
प्रा. गजानन होडे

**प्रकाशक**
**समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र**


**अंतरंग**


| | |
|---|---|
| महात्मा फुले – प्रेरणा आणि कार्य | ४ |
| बे-गमपुराच्या वाटेने... | ७ |
| भाड्याची सायकल | ११ |
| या कातरवेळी... | १४ |
| ‘फ्रीडम ऑन ट्रायल’ | १७ |
| भारताचे संविधान | २० |
| रंगनायिका | २२ |
| सप्तरंगी भावनांचे काव्यचित्र | २५ |
| गाढवी सोनार समाज | ३१ |
| बंदिशाळा | ३३ |

**कविता :**
प्रा. डॉ. सौ. दुर्गा गंगाधर जोशी,
अशोक सोनावणे,
डॉ. राजेंद्र माने



**मुखपृष्ठावरचे चित्र**
**अंतरजालावरून साभार**

**मांडणी/अक्षरजुळणी आस्वाद प्रकाशन**



**संपर्क : संपादक समरसता साहित्य पत्रिका**
**१/६ जैन इस्टेट, विलेज रोड,**
**भांडूप (प.), मुंबई – ७८**
**इमेल :** samarastaedit@gmail.com



**खाजगी वितरणासाठी**





आगामी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्थान निश्चित झाले असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरात हे शंभरावे साहित्य संमेलन संपन्न होणार आहे. न्यायमूर्ती रानडे आणि अन्य मंडळींनी पुण्यात पहिले साहित्य संमेलन आयोजित केले होते. त्यांची शतकपूर्ती पुण्यात होते आहे हा उत्तम योगच आहे. या शतकी संमेलनाच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणी नांदी संमेलने आयोजित होणार आहेत. ही एक चांगली संकल्पना आहे. जशा प्रकारे विविध ठिकाणाहून पंढरीसाठी दिंड्या निघतात आणि एकत्र येतात व पांडुरंगाची वारी सफल सुफल करतात, अगदी तसेच विविध ठिकाणच्या नांदी संमेलनातून भावजागृती होईल आणि शंभराव्या साहित्य संमेलनात ती परमोच्च शिखर गाठेल.

स्वाभाविकच शंभरावे संमेलन असल्याने ते भव्य दिव्य आणि नेत्रदीपक होईल यात शंका नाही. पण त्याचबरोबर पहिल्या संमेलनानिमित्त महात्मा फुले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची सोडवणूक कशाप्रकारे झाली आहे, याची प्रचीती या शंभराव्या साहित्य संमेलनातून यावी अशी अपेक्षा व्यक्त करतानाच समरसता साहित्य परिषद व समरसता साहित्य पत्रिका या साहित्य उत्सवात सर्व शक्तीनिशी सहभागी होण्याची ग्वाही देत आहेत. वंचित, उपेक्षित वर्गांची साहित्यऊर्मी आणि जाणिवा यांना योग्य स्थान उपलब्ध व्हावे अशी आग्रही मागणीही या निमित्ताने आम्ही करत आहोत.

**– रवींद्र गोळे**




# महात्मा फुले - प्रेरणा आणि कार्य


**महात्मा जोतीराव फुलेंकडून प्रेरणा घेऊन कार्य उभे करणाऱ्यांची रांग फार मोठी आहे, त्यात राजर्षी शाहू छत्रपतींचे कार्य उल्लेखनीय मानायला हवे. याचे कारण, असे कार्य उभे करताना त्यांना अनेक गुंतागुंतीचा सामना करावा लागला, अनेक प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागले. त्या सर्वांवर मात करत राजर्षी शाहूंनी त्यांचे समाजोद्धाराचे कार्य मोठ्या जोमाने उभे केले, त्यामागे महात्मा फुलेंच्या प्रेरणेचा मोठा भाग होता. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात आणि नंतरही महात्मा फुलेंच्या शिकवणीचा गाभा अनेकांनी आत्मसात केला. पुढे मर्यादित स्वरूपात का होईना, अनेकांनी कार्यही उभे केले.**

**काशीनाथ पवार**

९४२३४६९३२९

संत ज्ञानेश्वरांनी 'पसायदाना'मध्ये जे विश्वात्मक देवाला आवाहन केलेले आहे, त्याचेच पुढचे पाऊल महात्मा जोतीराव फुलेंच्या सर्वंकष मानवतावादी भूमिकेत दिसून येते. मूलगामी मानवतावादी भूमिकेतून जर त्यांचा ब्राम्हणविषयक दृष्टिकोन अभ्यासला, तर असे लक्षात येईल की, त्यांच्यामध्ये कोणत्याही जातीसाठी जातीद्वेषाचा कोणताही अंश नव्हता. पण चातुर्वर्ण्याचे नेते आणि शास्ते म्हणून मात्र ते ब्राम्हणशाहीच्या विरोधात होते. त्यांचा ब्राम्हणविरोध हा जातीद्वेषातून आलेला नव्हता, तर तो जातीव्यवस्थेला समूळ नष्ट करण्याच्या प्रेरणेतून आलेला होता. त्यांची हीच भूमिका पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जास्त खोलवर जाऊन समाजाच्या लक्षात आणून दिली. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबर जसे अनेक पुरोगामी विचारांचे ब्राम्हण मित्र आणि सहकारी जोडले गेले तसेच ते महात्मा फुलेंबरोबरही जोडले गेले होते. मक्तेदारीविरुद्ध लढण्यास तयार असणाऱ्या ब्राम्हणांचे त्यांनी कायम स्वागतच केले. त्यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात त्यांना अनेक विश्वासू, जिव्हाळ्याचे ब्राम्हण मित्र आणि सहकारी सतत लाभत गेले आणि महात्मा फुलेंनीही आनंदाने त्यांचे सहकार्य स्वीकारले, वेळोवेळी कृतज्ञताही व्यक्त केली. महात्मा फुलेंचा विरोध त्यांना होता, ज्यांना अनेक वर्षांपासून चालत आलेली समाजनेतृत्वाची मक्तेदारी आणि त्यातून आलेले अवाजवी समाज शोषणाचे हक्क सोडायचे नव्हते. उन्मत्त अपरिवर्तनीय जात्याभिमान आणि इतर वर्ण–जातींबद्दल पराकोटीचा तिरस्कार यावर महात्मा फुलेंचा आसुड तीष्ण वार करत होता, पण महात्मा फुलेंचे

कार्य केवळ चातुर्वर्ण्यावर किंवा विषमताधिष्ठित धर्मावर वार करण्याइतपतच मर्यादित नव्हते, तर त्यापेक्षा कितीतरी उच्च अशी संपूर्ण समतेची, मानवतेची आणि विश्वबंधुत्वाची अशी त्यांची प्रेरणा आणि शिकवण होती. त्यामध्ये वर्ण वा जातच काय; पण देश, धर्म, वंश यामधल्या भेदांनादेखील यत्किंचितही वाव नव्हता. या सर्वांचा विलय करून त्याहून श्रेष्ठ अशा मानवधर्माची, विश्वकुटुंबाची, सर्वसमावेशक वर्ण–जातीविहीन बंधुभावाची प्राणप्रतिष्ठा त्यांना करायची होती. सर्वंकष सामाजिक परिवर्तन–सर्वंकष क्रांती ही त्यांची घोषणा होती, तर मानवता आणि संपूर्ण समता ही त्यांची निष्ठा होती. हे सर्व बदल झाले पाहिजेत आणि ते होऊ शकतात, सत्यात येऊ शकतात, त्याला मूर्त रूप मिळू शकते यावर त्यांचा अढळ विश्वास आणि नितांत श्रद्धा होती म्हणूनच आपल्या या चिंतांनाला त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्मा'च्या रूपाने मूर्त रूप देऊन समाजाच्या सुपूर्त करत जणू पसायदानातले पुढचे पाऊल टाकले होते. पूर्वी कोणाच्याही ठायी न संभवलेल्या अशा अनेक प्रेरणा त्यांच्या ठायी संभवल्या होत्या आणि त्या अनुषंगानेच तेवढाच मोठा त्यांच्या कार्याचा आवाका होता. आजूबाजूला असणाऱ्या व विविध प्रकारच्या समस्या ओळखून त्यातील अनेक समस्यांवर मुक्ती शोधण्याची प्रथम प्रेरणा महात्मा फुलेंनाच त्यांच्या जीवन कार्यात झालेली दिसते. त्यात स्त्री–शिक्षण, स्त्री–मुक्ती, अस्पृश्यता निवारण, अस्पृश्यांचे शिक्षण, दुष्काळग्रस्तांचे प्रश्न, सारावाढीच्या सक्तीच्या वसुलीचे प्रश्न, सावकारी कर्ज आणि फसवणूक, जमीन हक्काचे प्रश्न, सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलूम जबरदस्तीचे प्रश्न अशा अनेक आघाड्यांवर, महात्मा फुलेंच्या ठिकाणी संभवलेल्या प्रेरणांनी सामाजिक क्रांतीची मशाल पेटवलेली दिसून येते. फक्त परखड मत व्यक्त करून थांबणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. एकदा एखादी गोष्ट समस्या म्हणून समोर आली आणि तिच्यात परिवर्तन व्हायला हवे हे मनाला पटले की महात्मा फुले थांबत नसत. त्यांच्या मनात आलेले विचार ते तत्काळ प्रभावाने कृतीमध्ये परावर्तित करत असत. जशी उक्ती तशी कृती या विचाराशी ते कायम पाइक राहिले, त्यामुळेच अशा अनेक समस्यांबाबत त्यांनी वेळोवेळी अनेक चळवळी केल्या. समस्या विषय समोर आला की त्या समस्येची तीव्रता ओळखून, आकलन करून चळवळ उभी करायची हेच त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे सूत्र होते. अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढण्याची प्रेरणा जशी भारतामध्ये फक्त महात्मा फुलेंनाच झाली, तशी भारतामध्ये वर्णजाती श्रेष्ठत्वाविरोधात सर्वंकष युद्ध पुकारण्याची प्रेरणाही महात्मा फुलेंनाच झाली. स्त्रियांची



बाजू घेऊन तिच्या विरोधातल्या संस्कृतीविरोधात, त्याच्या वर्चस्वाविरोधात आणि स्त्री–शिक्षणासाठी लढण्याची प्रेरणाही प्रथम महात्मा फुलेंनाच झाली आणि सावित्रीबाईंना स्त्री–शिक्षणाचे मोठे कार्य उभे करण्याची प्रेरणाही त्यांच्याकडूनच मिळाली.


एक गोष्ट आवर्जून लक्षात घ्यायला पाहिजे की, महात्मा फुलेंना इतिहासातले सर्वात पुरातन, सर्वात संघटित, सर्वात चिवट, परंपराधिष्ठित, धर्माधिष्ठित, जन्मजात अपरिवर्तनीय अशा विषमतेवर आधारलेल्या, धर्मसत्ता–धनसत्ता व परंपराधिष्ठित समाजव्यवस्था यांचा भरभक्कम पाठिंबा लाभलेल्या प्रस्थापितांना आव्हान द्यायचे होते. याच आव्हानाची प्रेरणा महात्मा फुलेंच्या लिखाणालाही होती. रूढार्थाने ते कोणी साहित्यिक नव्हते. त्यांचा कुणी गुरू, प्रेरक वा मार्गदर्शक नव्हता. त्यांनी त्यावेळी जे थोडेबहुत वाचले, ऐकले आणि जे उघड्या डोळ्यांनी पहिले त्यातून त्यांचे साहित्य निर्माण झाले. त्यांचे लिखाण मुख्यत्वे दोन प्रकारचे होते. एक प्रस्थापितांना आव्हान देणारे, मनातला उद्वेग, संताप, तळतळाट व्यक्त करणारे आणि दुसरे म्हणजे स्त्री–शूद्र–अतिशूद्रांना उपदेश करणारे. यातून त्यांनी दलित समाजापुढे हे आणले की, तुमची अवस्था आज जरी अशी दिसत असली तरी ती पूर्वीपासून तशी नव्हती. पूर्वी तुम्हालाही समानतेचे हक्क होते. निसर्गाने

तुमच्याठायीही उच्च वर्णीयांइतकेच गुण उत्पन्न केलेले आहेत. तुम्ही जर प्रस्थापितांची गुलामगिरी झिडकारलीत तर तुम्हाला तुमचे हक्क पुन्हा प्रस्थापित करता येतील, परंतु त्यासाठी तुम्हाला प्रखर संघर्ष करण्याची तयारी केली पाहिजे.

महात्मा फुलेंच्या याच प्रेरणांचा मूळ गाभा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हाती लागला. महात्मा फुलेंच्याच तळमळीची आणि प्रेरणांची आच बाबासाहेबांना जीवनभर ऊर्जा देत राहिली. म्हणूनच बाबासाहेबांनी आपल्या जीवनकार्यातला महात्मा फुलेंचा वारसा जगाला अभिमानाने सांगितला.

महात्मा जोतीराव फुलेंकडून प्रेरणा घेऊन कार्य उभे करणाऱ्यांची रांग फार मोठी आहे, त्यात राजर्षी शाहू छत्रपतींचे कार्य उल्लेखनीय मानायला हवे. याचे कारण, असे कार्य उभे करताना त्यांना अनेक गुंतागुंतीचा सामना करावा लागला, अनेक प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागले. त्या सर्वांवर मात करत राजर्षी शाहूंनी त्यांचे समाजोद्धाराचे कार्य मोठ्या जोमाने उभे केले, त्यामागे महात्मा फुलेंच्या प्रेरणेचा मोठा भाग होता. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात आणि नंतरही महात्मा फुलेंच्या शिकवणीचा गाभा अनेकांनी आत्मसात केला. पुढे मर्यादित स्वरूपात का होईना, अनेकांनी कार्यही उभे केले. त्यात दखल घेता येईल असे नाव जेधे आणि जवळकर यांचे आहे. जेधे-जवळकर दोघेही फुले संप्रदायाचे धडाडीचे तरुण कार्यकर्ते म्हणून १९२०-१९३० च्या दशकात समाजात झळकले. पुढे १९३२ मध्ये जवळकर तारुण्याच्या आणि कर्तृत्वाच्या ऐन उमेदीत अकाली मृत्युमुखी पडले. आगरकरांच्या अकाली मृत्यूची हळहळ जशी साऱ्या सर्वांगीण सुधारकांना वाटत राहिली तशी ती जवळकरांच्या मृत्यूचीही वाटायला हवी एवढ्या महान दर्जाचे आणि फुले संप्रदायाला दिशा देण्याचे कार्य जवळकरांनी केलेले आहे.

महात्मा फुले हे त्यांच्या समकालीन आणि सर्वकालीन असणाऱ्या कोणत्याही विचारवंतापेक्षा किंवा नेत्यांपेक्षा वेगळे आहेत, श्रेष्ठ आहेत ते यामुळेच की, त्यांच्याकडून मिळालेल्या प्रेरणा आजही स्फूर्तीदायक वाटतात, त्यांचे विचार आजही सर्वोत्तम मार्गदर्शन करतील एवढे प्रभावी वाटतात, सर्वकालीन वाटतात. एवढे सर्वकालीन प्रेरणा देणारे कार्य वाट्याला येण्याचे भाग्य फार थोड्या समाजपुरुषांच्या वाट्याला आलेले आहे, त्यात महात्मा जोतीराव फुले सर्वात पुढे आहेत असे म्हणता येईल.



संघ जगणारा माणूस
विवेक पुस्तक प्रकाशन
लेखक - रवींद्र गोळे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या शंभर वर्षांत असंख्य कार्येकर्ते तयार केले . ज्यांनी आपल्या जीवनाला संघस्पर्श करून घेतला आणि जगण्याचा ध्यास आणि श्वास संघ झाला अशापैकी एक पद्मश्री रमेश पतंगे. लेखक, विचारवंत, पत्रकार, समाजचिंतक अशा विविध भूमिका पार पाडताना संघाचा विचार प्रकट करणाऱ्या रमेश पतंगेचे शब्दचित्र म्हणजे संघ जगणारा माणूस

मूळ किंमत २२५/-, सवलत मूल्य २००/-

संपर्क : कार्यालय -७५०६७३२९०५
आणि स्थानिक प्रतिनिधी

Bank Details - Hindustan Prakashan Sanstha
Bank Of Maharashtra, Prabhdevi Branch
IFSC Code - MAHB0000318
A/C No. 20109800154




# बे-गमपुराच्या वाटेने...

**क्षणभर डोळे बंद करून संत रविदासानी मांडलेली बे-गमपुरा संकल्पना अनुभवण्याचा प्रयत्न केला तर भारत एक लोकशाही राष्ट्र म्हणून या वाटेवर आहे. मात्र असे पूर्ण राष्ट्र होणे आणि विकसित भारत २०४७ जवळपास आर्थिक दृष्टीने सारखे असले तरी भयमुक्त आणि भेदमुक्त समरस भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व समाज घटक यांना परिश्रम घ्यावे लागतील, तेव्हा कुठे सामाजिक व राजकीय दृष्टीने असे राज्य येऊ शकेल असा आशावाद वाटतो.**

**स्नेहलता स्वामी**

७७२१८२९७८०

जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती असे म्हटले जाते, याचा अनेकदा आपणास अनुभव येतो. संतानी रंजल्या गांजल्यांसाठी परमेश्वराकडे दान मागितले. जे खळांची व्यंकटी सांडो हे मागणे मागितले. सारे जग मांगल्याच्या वाटेवर चालावे, सदाचार नांदावा ही सर्व संतांची भूमिका राहिली आहे.

ज्ञानेश्वर माऊलीनी वाक्यज्ञ पूर्ण झाल्यानंतर विश्व कल्याण विश्वात्मकाकडे मागितले. 'भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे, दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्य पाहो, जो जे वांछील तो ते लाहो प्राणीजात' ही मंगलमय प्रार्थना केली. संताच्या ह्रदयी अपार स्नेह, करुणा साठलेली असते. त्यामुळे संत विश्व कल्याणाचे मागणे मागतात. आणि साधू कोणास म्हणावे हेही एका वाक्यात सांगितले...

जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले
तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावा

भारत साधूसंत, ऋषीमुनीची पावन भूमी. याच भूमीत वाल्मीकींनी रामायण लिहिले, व्यास मुनींनी महाभारत, तर वेदांचे ज्ञान उपनिषदात मांडले, आगम निगम पुराणे आली. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून भगवद्गीता मराठीत अनुवादित केली. संतांनी काय नाही दिले. अनेक सिद्धांत मांडले. तत्त्वज्ञानाचे भंडार खुले केले. अध्यात्मासोबत व्यक्ती, समाज, राष्ट्र विकासाचा मंत्र दिला. त्यामुळे जे भारतात नाही असे ज्ञान जगात कुठेही नाही. खगोल, विज्ञान, गणित सारे ऋषीमुनींनी मांडून ठेवले आहेच. भारतीय तत्त्वज्ञानास संत परंपरेचा पावन गंध आहे. मग तो भारताचा पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर कोणताही भाग राहो, ही भूमी संत तत्त्वज्ञानाने

सदैव उजळत राहिली आहे, ती अनादी कालापासून. शतक कोणतेही असो, संतांनी राष्ट्राला दिशा दिली आहे. मध्ययुगीन काळात भारतीय भूमीवर आक्रमणे सुरू झाली. भारतीय वैभव मिटत होते. भौतिक वैभवासोबत ज्ञानकेंद्रे मिटू लागली. त्या आभावाने एक अंधकार पसरत होता. गुलामीचे पाश आवळले जात असता समाज रसातळाला जात होता.

तत्त्वज्ञानावर जणू धूळ जमू लागली. अचानक पूर यावा आणि त्याने सारा संसार वाहून न्यावा अशी स्थिती मध्ययुगात झाली आणि संतांनी भक्ती चळवळ सुरू केली संपूर्ण भारतभर. ही भक्ती चळवळ होती समाजाला जागे करण्याची, समाज सुधारणेची. केवळ व्यक्तीविकास नाही तर राष्ट्रविकास साधू पाहणाऱ्या या संतपरंपरेने मध्ययुग ढवळून टाकले. त्यात रामानुजन परंपरेतील रामानंद स्वामी यांनी उत्तरेत क्रांती घडवली. त्यांचे शिष्य कबीर कोष्टी, धन्ना जाट, पिपा क्षेत्रीय, सेना न्हावी आणि रामदास चर्मकार समाजातील. रामानंद स्वामी यांच्या आखाड्यातून शरीर बळकटीसोबत अध्यात्म व जीवन व्यवहार यासोबतच समाजउन्नतीचे शिक्षण मिळू लागले. संत कबीर आणि संत रविदास हे रामानंदांचे शिष्य यांची शिखांचे पहिले गुरू गुरुनानक देवजी यांचेशी काशी येथे भेट झाली. जसा त्रिवेणी संगम व्हावा तेवढा हा मधुर संगम होता ज्ञानाचा. अर्थात संत व गुरू यांनी त्या त्या राष्ट्राचे नेतृत्व केले. जे जे वाईट ते समाजाने त्यागावे व जे चांगले शाश्वत ते स्वीकारावे, हा बोध देत होते याचा प्रत्यय आपणास येतो.

संत रविदास महाराज यांचे २०२६ हे ६५० वे जन्मशताब्दी वर्ष. त्यांचे विचार आजही अमर सुगंध निर्माण करीत असून आज जेव्हा भारत देश स्वतंत्र होऊन ७९ वर्षे पूर्ण झाली. ८० व्या वर्षात आज आपणास स्वातंत्र्य ही संकल्पना पूर्ण माहिती आहे किंवा ब्रिटिशविरोधी लढ्यात आपणास पारतंत्र्याची जाणीव होऊन स्वराज्य स्वातंत्र्य अधिक कळले असेही म्हणता येईल. त्याआधी महाराणा प्रताप यांना याची तीव्र जाणीव झाली आणि त्यांनी अकबरविरोधात शस्त्र उचलले.

छत्रपतींनी पातशाही पालथी घालून औरंगजेबास चपराक लागवली. संत रामदासांनी महाराष्ट्र धर्म वाढवावा हा केलेला उपदेशही आपणास परिचित असेल. मात्र त्याआधी एका संतांनी परतंत्र, पराधीनता याबद्दल भाष्य केले होते व गुलामीत जगण्यापेक्षा स्मशानात जावे हा सज्जड इशारा दिल्याचे फारसे कोणी वाचले नसावे. असे संत म्हणजे संत शिरोमणी रविदास महाराज होत. त्यांनी गुलामीला पाप म्हटले आहे.

माणसास सुखकर दोनच ठाव

एक स्वराज दुसरा स्मशान गाव

यापेक्षा मोठी चेतावणी काय असू शकते?

ते म्हणतात की, माणसाने जगावे तर सन्मानाने, नाही तर स्मशानात जावे. अर्थात जीवन म्हणजे स्वातंत्र्य आणि पराधिनता मृत्यूपेक्षा वाईट. त्यापेक्षा मृत्यू बरा, हे विधान अत्यंत क्रांतिकारी आहे असे म्हणायला हरकत नाही. आणि १४ व्या शतकात तर नक्कीच आहे.

पराधिनता पाप मोठे नाही हे सर्वथा खोटे

किंवा

पराधीन हा दास, पात्र न तो कोणाच्या प्रेमास

हे त्यांचे विधान त्याकाळी केलेले होते जेव्हा दिल्लीवर सिकंदर लोदी या लोदी घराण्याचे राज्य होते.

क्वचित एखाद्या संतांनी असे विधान केले असावे. खरे तर गुलामास गुलामीचा जाणीव झाल्याशिवाय तो पेटून उठू शकत नाही असे म्हटले जाते आणि १४ व्या शतकात संत रविदास समाजाला आपल्या दोह्यातून ती जाणीव करून देतात. खरे तर स्वातंत्र्याची किंमत आता आपणास पूर्ण माहीत आहे. मानव हक्क म्हणून त्यास आता मान्यता मिळाली आहे. व्यक्तीस्वातंत्र्य म्हणजे काय हे संविधानाने आपणास ते स्वातंत्र्य बहाल केले त्यावेळी व आज त्याची पूर्ण जाणीव होते, पण पराधीन हा दास, तो कोणाच्या प्रेमास पात्र ठरू शकत नाही, कारण तो स्वतः साठी व इतरांसाठी काहीही करू शकत नाही. तो त्याचा मालक नाही तर कोणीतरी त्याचा मालक असता गुलामावर कोण प्रेम करेल, हे वास्तव ते आपल्या दोह्यातून मांडतात. त्या काळातील तो अत्यंत पुढारलेला विचार असून आजही अत्यंत प्रासंगिक आहे. अनेक जागतिक संघटनांनी या विषयावर काम केले तेव्हा कुठे मानवी गुलामी, वेठबिगारी, मानवी विक्री कमी झाली. अनेक देशांनी गुलामगिरीविरुद्ध लढा दिला त्या सर्वांचे प्रेरणास्थान संत रविदास हेच होत. त्यांनी पराधीनता हा वापरलेला शब्द केवळ राजकीय होता असे नाही, तो सामाजिक व आर्थिक गुलामगिरी या व्यापक अर्थाने ही असावा हेही लक्षात येते. त्यानंतर जगभर व्यापक क्रांती झाली तशी भारतातही सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज अनेक समाजसुधारक यांनी उठवला आणि सामाजिक न्याय मिळाला.आणि आज जेव्हा आपण भारतीय संविधानातील प्रास्ताविकेत शब्द वाचतो स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि राजकीय, सामाजिक, आर्थिक न्याय, त्यावेळी संत रविदासांच्या या विचारांच्या उंची व खोलीची आपणास व्याप्ती कळते व राजकीय व सामाजिक विचारवंत म्हणून त्यांचे स्थान जगात कोणी राजकीय सामाजिक विचार मांडण्यास सुरुवात केली त्या श्रेणीत आहेत याची जाणीव होते.

स्वातंत्र्य ह्या संकल्पनेबरोबर ते आणखी एक राजकीय संकल्पना ते मांडतात, ते म्हणजे राज्य याची.आपणास कौटिल्य किंवा प्लुटोची राज्य ही संकल्पना माहिती आहे. मात्र एक संत राज्याची संकल्पना काय मांडतात? तर यात न राजा आहे, ना समाजवर्गीकरण, ना कोणते राज्याचे अंग. केवळ असे राज्य–

असे मागतो मी राज्य जेथे मिळे सर्वां अन्न
न कोणता जिथे भेद सारे राहती बंधू सम

सर्वांना अन्न ही प्राथमिक गरज आणि दुसरी गरज भेद नसलेले आणि त्यातही बंधुभाव असलेले राज्य ते मागतात.

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे त्रयी फ्रेंच राज्यक्रांतीतून मिळाली असे आपण मानतो ती तत्त्वे संत रविदासांचे विचारात दिसतात. आणि फ्रेंच राज्यक्रांतीच्या चारशे वर्षे आधीचा हा काळ आहे हे विसरता येत नाही. भेद नसलेले म्हणजे समता असलेले राज्य आणि सारे बंधूसम नांदावेत हा बंधुतेचा विचार संत रविदासांच्या विचारातून जाणवतो आणि एवढेच नाही, तर राज्य कसे असावे यासाठी त्यांनी वापरलेली बे–गमपुरा ही संकल्पना एखाद्या प्रबंधाचा विषय ठरू शकते एवढी व्यापक उदात्त, आधुनिक आणि प्रगल्भ विचारांचा परिचय देणारी आहे. आज ज्यास आपण लोक कल्याणकारी राज्य म्हणतो या आधुनिक संकल्पनेशी जवळीक सांगणारी तरी त्याहून अधिक पुढे असणारी ही संकल्पना

मागे उल्लेख केल्याप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनीही पसायदान मागत विश्वकल्याणची प्रार्थना केली. दुरितांचे तिमिर जावो भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे म्हटले त्याप्रमाणेच एक अशा सुंदर जगाची राज्याची कल्पना संत रविदास करतात आणि त्यांच्या राज्याचे नाव आहे बे–गमपुरा अर्थात दुःख विरहित एखादे शहर, राज्य, ग्राम. त्यास महात्मा गांधीजींच्या शब्दात रामराज्य म्हणावे का? का त्यापुढील अधिक काही या संकल्पनेत सामावलेले आहे.

गांधीजींच्या मते, रामराज्याची राजकीय व्याख्या, 'धर्म, शांतता, सौहार्द आणि लहान–मोठे, उच्च–नीच, सर्व प्राणिमात्र आणि पृथ्वीच्यासुद्धा आनंदाचा विचार करून वैश्विक जाणिवेवर आधारलेले राज्य' अशी करता येते. संविधानाला अपेक्षित लोक कल्याणकारी राज्य काय आहे, याचा विचार केला तर लोककल्याणकारी राज्य म्हणजे अशी राज्यव्यवस्था जिथे सरकार केवळ कायदा व सुव्यवस्था राखत नाही, तर नागरिकांचे सामाजिक व आर्थिक हित जोपासण्याची आणि सर्वांना समान संधी देण्याची मुख्य जबाबदारी स्वीकारते.



यात शिक्षण, आरोग्य, अन्न आणि निवारा यांसारख्या मूलभूत गरजा पुरवण्यावर भर दिला जातो.

संत रविदास १४ व्या शतकात काय संकल्पना मांडतात? बे–गमपुरा संकल्पना लोककल्याणकारी राज्यापेक्षाही अधिक पुढची अवस्था आहे का, तर त्याचे उत्तर निश्चित होय असेच आहे..

बे–गमपुरा शहराचे नाव
दुःख चिंतेस नाही ठाव
खंत ना कर गुन्हा ना भय
उच ना नीच, राव ना रंक
स्वातंत्र्य समतेची नांदी
सुख समृद्धी वसे शांति
सांगे रविदास चर्मकार
सारे व्हावेत स्नेही एक परिवार

दुःखविरहित असे एक राज्य, जिथे कोणतीही खंत कोणाला ही सतावणार नाही. कोणतीही भविष्याची चिंता असणार नाही. ना कोणीही गुन्हा करेल. अपराध नसल्याने भय ही असणार नाही. उचनीच भेदभाव नाहीत व गरीब–श्रीमंत असे वर्ग नाहीत.

प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र असेल, समाजात समता असेल आणि सुख आणि समृद्धी नांदेल. आणि एवढेच नाही तर सारे जणू एक परिवार आहेत असे राहतील. बंधुता तर यात अपेक्षित आहे यापुढे जाऊन एकात्मताही त्याना अपेक्षित आहे.

आता ही संकल्पना आपण जगातील कोणत्याही विद्वानाने मांडलेल्या विचारांची ताडून पाहिली तर अधिक सरस आहे. आणि आजच्या लोककल्याणकारी राज्य संकल्पनेहून थोडी अधिक व्यापक असल्याचे जाणवते. दुःख, चिंता, खंत नसावी, सारे स्नेही व्हावेत ही संकल्पना संत ज्ञानेश्वर यांचे दुरितांचे तिमिर जावो, जे खळाची व्यंकटी सांडो, भूता परस्परे जडोशी जुळते. यातून संत रविदासांचे हृदय अपार स्नेह व करुणेने भरलेले आहे याची जाणीव होते. हे संत हृदयाचे बोल आहेत. मात्र ते जेंव्हा कर नसावा, डर नसावा, कोणताही अपराध घडू नये असे म्हणतात, त्यावेळी ते एक राजकीय तत्त्ववेत्ता ठरतात. आणि एका अत्यंत आदर्श राज्यव्यवस्थेची अपेक्षा करतात. जिथे सर्वजण आत्मनिर्भर असतील. कौटिल्यही अत्यंत कमी कर असावा जेणे करून लोक ते आनंदाने भरतील असे म्हणतात. जसे फुलातून मध सहज गोळा होतो तेवढे हे सुलभ असावे. मात्र संत रविदास कर नसावा असे म्हणतात. ही त्याच्या पुढील अवस्था आहे. असे राज्य अस्तित्वात असू शकते. संयुक्त अरब अमिरातीमधे आयकर नाही, सिक्कीममधे ही मूळ सिक्कीमवासीयांना कर नाही. असे राज्य १४ व्या शतकात संत रविदास यांनी कल्पिले हे विशेष. असे राज्य अत्यंत आदर्श राज्याचा भाग असू शकेल आणि ते राज्य अत्यंत समृद्ध असेल जिथे व्यापारातून मोठ्या प्रमाणात चलन निर्माण होऊ शकेल असे समृद्ध व सुखी राज्याची संत रविदास कल्पना करतात. यापुढचे विशेष म्हणजे आज आपण पाहतो, गुन्ह्याचे प्रमाण आणि न्यायालयातील सुनावणी संख्या. जर अपराध होणार नाहीत तर कोणालाही भय असणार नाहीत. अपराधविरहित राज्य निर्माण होण्यासाठी काही अंशी सर्व हातांना काम असेल तर चोरी, दरोडा असे गुन्हे प्रमाण बरेच अंशी कमी होते आणि जेव्हा ह्युअनस्तंग भारतात आला त्यावेळी इथे घरांना दरवाजे, कडी-कोंडा नसल्याचे त्याने पाहिले होते. कदाचित अशी स्थिती संत रविदासाना अपेक्षित असेल. गरीब श्रीमंत ही दरी नसल्याने अशी आदर्श स्थिती येऊ शकते असा त्यांना आशावाद वाटतो.

क्षणभर डोळे बंद करून संत रविदासानी मांडलेली बे-गमपुरा संकल्पना अनुभवण्याचा प्रयत्न केला तर भारत एक लोकशाही राष्ट्र म्हणून या वाटेवर आहे. मात्र असे पूर्ण राष्ट्र होणे आणि विकसित भारत २०४७ जवळपास आर्थिक दृष्टीने सारखे असले तरी भयमुक्त आणि भेदमुक्त समरस भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व समाज घटक यांना परिश्रम घ्यावे लागतील, तेव्हा कुठे सामाजिक व राजकीय दृष्टीने असे राज्य येऊ शकेल असा आशावाद वाटतो.







# भाड्याची सायकल

**सायकलचा उपयोग फक्त मौजमजेसाठीच नव्हता, तर अनेक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीही व्हायचा. गावालगतच्या शेजारच्या गावात जाऊन सायंकाळची 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा' लावण्यासाठी आम्ही याच भाड्याच्या सायकलचा वापर करायचो. शाखा संपवून रात्रीच्या वेळी परत येताना संपूर्ण रस्त्यावर गडद अंधार पसरलेला असायचा. रस्त्यावर दिवे नसायचे, ना सायकलीला हेडलाइट असायची! मनामध्ये भीतीची धुकधुकी असायची, पण त्या अंधाराला पळवून लावण्यासाठी आम्ही एका हाताने हँडल धरून दुसऱ्या हाताने सातत्याने सायकलची घंटी ट्रिंग-ट्रिंग वाजवत, मोठ्याने गाणी गात किंवा श्लोक म्हणत आपलं गाव गाठायचो. तो अंधारातला प्रवास, ती भीती आणि तरीही पुढे जाण्याची जिद्द एक वेगळाच आत्मविश्वास देऊन जायची.**

**अमोल तपासे**

९९६०६७३७८९

आठवणींच्या गल्लीत सहज डोकावून पाहिलं, की आपलं मन क्षणात वर्तमानकाळातून निसटून थेट लहानपणीच्या त्या धुरकट, धुंद आणि आनंददायी रस्त्यांवर जाऊन पोहोचतं. आजच्या डिजिटल युगात जन्मलेल्या आणि लहानाची मोठी होणाऱ्या हायटेक पिढीला पाहिलं, की मला राहून राहून सांगावंसं वाटतं– अहो, जीवनाची खरी मजा, तो अथांग आनंद त्या मोबाईलच्या लहानशा चकाकणाऱ्या स्क्रीनवर किंवा गेमिंग झोनमध्ये कधीच नव्हता; तो तर 'आठ आण्यांच्या' भाड्याच्या सायकलच्या पॅडलवर आणि तिच्या घंटीच्या तालावर होता!

तेव्हा आपल्या गावातल्या किंवा बस स्टँडवरच्या सायकलीच्या दुकानाचं अप्रूप काही वेगळंच असायचं. दुकानासमोर अगदी नेटकेपणाने एका रांगेत लावून ठेवलेल्या त्या नव्या-जुन्या सायकली म्हणजे आमच्या बालपणीच्या कल्पनेतील अलिशान 'बीएमडब्ल्यू' (BMW) किंवा 'मर्सिडीज'पेक्षा कमी नव्हत्या. सायकल भाड्याने मिळवणं हा काही एक साधा आर्थिक व्यवहार नव्हता, तर तो आमच्यासाठी एखाद्या युद्धभूमीवर जिंकायचा खूप मोठा 'मिशन' असायचा. दुकानात शिरल्यावर काउंटरवर बसलेला तो सायकलवाला काका आम्हाला एखाद्या विशाल साम्राज्याच्या राजासारखा वाटायचा! आपण तिथं पोहोचलो की मोहिमेचा पहिला महत्त्वाचा टप्पा सुरू व्हायचा–त्या काकांच्या टेबलवर असलेल्या मोठ्या, तेलकट आणि जाड वहीत आपलं नाव आणि वेळ नोंदवणे. त्या वहीत आपलं नाव आणि सायकल नेण्याची वेळ एकदा का खतावणीत पडली, की आपण जणू काही लंडनला जाण्याचा अधिकृत पासपोर्टच



हातात मिळवलाय, असा रुबाब आमच्या चेहऱ्यावर यायचा!

पण खरी कसरत तर नाव नोंदवल्यानंतर पुढे असायची. भाड्याने मिळणाऱ्या त्या सायकलींचे नखरे आणि मिजास काही कमी नसायची! कधी तिची साखळी अचानक उतरलेली असायची, तर कधी ब्रेक दाबताच गाडी थांबण्याऐवजी ती अजून वेगाने पुढे पळायची. कधी हँडल एका बाजूला झुकलेलं असायचं, तर कधी सीट एका बाजूला सरकलेली असायची. पण आम्हा पोरांना त्या तांत्रिक दोषांचं काय पडलंय? सायकल हातात मिळण्याआधी दुकानातल्या त्या लहानशा लोखंडी पंपाने टायर-ट्यूबमध्ये 'फुस-फुस' करत हवा भरून घेणं हासुद्धा आमच्यासाठी एक मोठा सोहळा असायचा. हवा पुरेशी भरली आहे की नाही हे तपासण्यासाठी टायरवर हाताने मारलेली ती छोटीशी, ठणठणीत थाप म्हणजे सायकल रस्त्यावर धावण्यासाठी सज्ज असल्याचं अंतिम 'फिटनेस सर्टिफिकेट' असायचं!

आणि हो, संपूर्ण गावात आमची ओळख आणि पतही भारी होती बरं का! दुकानाजवळ जाऊन अगदी आदराने म्हणायचो, 'अहो मामा, द्या की ती एक हिरो सायकल. आम्ही अगदी वेळेवर, व्यवस्थित आणून देतो!' आमचा तो निरागस, ओळखीचा चेहरा पाहून तो दुकानवाला मामासुद्धा विश्वासाने ती चकचकीत, काळ्या रंगाची 'हिरो सायकल' आमच्या स्वाधीन करायचा. त्या काळी १ तास हिरो सायकल चालवण्याचं मूल्य काय होतं माहित्येय? फक्त ५० पैसे! होय, ते आपले लाडके आणि श्रीमंतीची अनुभूती देणारे 'आठ आणे'! त्या ५० पैशांच्या नाण्यात अख्खा गाव जिंकल्याचा, संपूर्ण जगाची सफर केल्याचा जो आनंद मिळायचा, त्याची तुलना आजच्या करोडो रुपयांशीही होऊ शकत नाही.

मग काय! एकदा का सायकलच्या सीटवर पाय ठेवला की आमचं राज्य सुरू व्हायचं. वय लहान असल्यामुळे ज्यांची उंची कमी असायची, त्यांना सीटवर बसून पॅडल मारता यायचं नाही. पण त्यावरही भारतीय जुगाड तयार असायचा! सीटखालच्या त्रिकोणी फ्रेममधून एक पाय आत टाकून, तिरके उभे राहून मारलेली 'कात्री' सायकल! एकदा का कात्री मारून सायकल गतीमध्ये आली, की मग समोरचा वारा आणि आपण! ना कोणाच्या गाडीची भीती, ना अभ्यासाचं किंवा भविष्याचं टेन्शन. गल्लीतल्या एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत ती भाड्याची सायकल सुसाट पळवताना आम्ही स्वतःला एखाद्या गाजलेल्या हिंदी पिक्चरचा 'हिरो'च समजायचो. सायकलची ती पितळी घंटी 'ट्रिंग-ट्रिंग... ट्रिंग-ट्रिंग' वाजवत रस्त्याने जाणाऱ्या कोंबड्या, कुत्रे, शेळ्या आणि वाटसरू माणसांना बाजूला सरकवण्यात जो एक वेगळाच रोमांच आणि थरार असायचा, तो आजच्या कोट्यवधींच्या आलिशान कार चालवण्यातही नक्कीच मिळणार नाही!

पण या सायकल प्रवासात कधी कधी अपघातांचे थरारही घडायचे. एकदा अशीच सायकल जोरात पळवताना माझं नियंत्रण सुटलं आणि मी सायकलसकट रस्त्याकडेला जोरात कोसळलो. गुढघ्याला आणि कोपराला भयंकर खरचटलं, रक्ताची धार लागली. पण त्या वेळी दुखापतीच्या वेदनेपेक्षा सायकलला काही मोडतोड झाली नाही ना, याचीच काळजी जास्त असायची! त्या दिवशी पडल्यामुळे पायावर उठलेला तो जखमेचा वण आज इतक्या वर्षांनंतरही माझ्या शरीरावर कायम आहे. आज जेव्हा जेव्हा माझी नजर त्या जुन्या व्रणावर पडते, तेव्हा तो व्रण मला दुःखाची नाही, तर माझ्या बालपणातील त्या सायकलच्या असीम आनंदाची आणि साहसाची गोड


आठवण करून देतो.

सायकलचा उपयोग फक्त मौजमजेसाठीच नव्हता, तर अनेक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीही व्हायचा. गावालगतच्या शेजारच्या गावात जाऊन सायंकाळची 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा' लावण्यासाठी आम्ही याच भाड्याच्या सायकलचा वापर करायचो. शाखेकडे जाणारा रस्ता अत्यंत खडकाळ, उघडाबोडका, दोन्ही बाजूंनी गिट्टी पसरलेला आणि धुळीने माखलेला असायचा. त्या कच्च्या रस्त्यावरून सायकल चालवताना हाताला आणि पायाला चांगलाच व्यायाम व्हायचा. शाखा संपवून रात्रीच्या वेळी परत येताना संपूर्ण रस्त्यावर गडद अंधार पसरलेला असायचा. रस्त्यावर दिवे नसायचे, ना सायकलीला हेडलाइट असायची! अशा अंधाऱ्या रात्री रस्त्यावरून परतताना आजूबाजूच्या झाडांवरून आणि डोक्यावरून भीतीदायक वटवाघळे भिरभिरत फिरायची. मनामध्ये भीतीची धुकधुकी असायची, फजिती व्हायची, पण त्या अंधाराला पळवून लावण्यासाठी आम्ही एका हाताने हँडल धरून दुसऱ्या हाताने सातत्याने सायकलची घंटी ट्रिंग-ट्रिंग वाजवत, मोठ्याने गाणी गात किंवा श्लोक म्हणत आपलं गाव गाठायचो. तो अंधारातला प्रवास, ती भीती आणि तरीही पुढे जाण्याची जिद्द एक वेगळाच आत्मविश्वास देऊन जायची.

आनंदाचा हा खेळ खेळताना ५५ व्या मिनिटाला मात्र आमची धाकधूक वाढायची! सायकल दुकानाकडे परत वळवताना छाती जोरात धडधडायची, की काका जास्त वेळ झाला म्हणून अतिरिक्त आठ आणे किंवा एक रुपया मागतात की काय! ५९ व्या मिनिटाला अगदी धावत-पळत, हसत-खेळत सायकल दुकानात जमा करायचो आणि काकांनी वेळेत जमा केल्याची पोचपावती म्हणून वहीत खूण केली की मोकळा श्वास घ्यायचो. ती ५५ व्या मिनिटाची धावपळ, ती वेळेची कसरत आणि सायकल जमा केल्यानंतर मिळणारा तो निवांत आनंद काही वेगळाच होता.

आज काळ पूर्णपणे बदलला आहे. तंत्रज्ञानाने महाकाय झेप घेतली आहे. प्रत्येकाच्या हातामध्ये महागडे टचस्क्रीन स्मार्टफोन्स आले आहेत, हाय-स्पीड ५ जी इंटरनेट आलं आहे, घरात एसी आणि बाहेर आलिशान वाहने आली आहेत, लॅपटॉप आणि गेमिंग झोन आले आहेत. आजची पिढी बोटांच्या एका क्लिकवर जगभर फिरू शकते. पण मनापासून आणि सचोटीने सांगायचं तर, आजच्या या अत्यंत वेगवान, ऑनलाईन आणि आभासी दुनियेत बालपणाचा तो खरा निरागसपणा कुठेतरी कायमचा हरवला आहे.

त्या काळी ना मोबाईलचं नेटवर्क होतं, ना कसली मानसिक चिंता.. ५० पैशांच्या त्या एका तासात, वाऱ्याशी स्पर्धा करताना जो अवर्णनीय, अथांग आणि निर्मळ आनंद मिळायचा, तो आनंद आजच्या जगातल्या कोणत्याही महागड्या गॅझेटमध्ये किंवा स्क्रीनवर शोधूनही सापडणार नाही. खरोखरच, आज जग खूप बदललंय, आपणही मोठे झालोय हे खरं; पण आपल्या बालपणाच्या त्या छोट्या छोट्या गोष्टींमध्ये, धुळीने माखलेल्या रस्त्यांवर आणि आठवणींच्या त्या सुखद गल्लीतच आयुष्याची खरी आणि अथांग मजा दडलेली होती!






# या कातरवेळी...

लेखक अरविंद गोखले यांची ‘कातरवेळ’ नावाची कथा आहे. नुकतंच लग्न झालेली मुलगी काही महिन्यांनी माहेरी येते. सुखवस्तू सुसंस्कृत कुटुंबात तिला दिलेलं. माहेरीही कौतुकाचं वातावरण. दिवसभर नातेवाईक, शेजारी, मैत्रिणी यांच्यासोबत दिवस छान जातो. तिला तिच्या नशिबाचा हेवा वाटू लागतो. ती घरी परतते तेव्हा तिन्हीसांज झालेली असते. घरी कोणीही नसतं आणि त्यावेळी तिला अगदी करमेनासं होतं. त्यावेळी तिला पुसून टाकलेली तिच्या प्रियकराची आठवण येते. आणि ती विचार करते की, या कातरवेळी तो कशाची आठवण करत असेल!

अश्विनी जांभेकर पितळे

९९२२९५२२५८

सूर्यास्ताची वेळ फार विचित्र असते. क्षितिजावर रंगांची उधळण असते आणि मनात भावानांची! लांबणाऱ्या सावल्या मनाचा आवाका विस्तारत जातात. घराकडे परतणाऱ्या एखाद्या टिटवीचा भवताल चिरत जाणारा आवाज काळीजसुद्धा चिरत जातो. कसली तरी हुरहूर, अनामिक काहूर मनात माजलेलं असतं. दिवसभर समंजसपणे वागणारं मन, बुद्धीच्या तावडीतून सुटू पाहतं. मन सतत असमाधानी असतं, हट्टी मुलासारखं! जे आहे, त्यापेक्षा जे नाही ते सतत दाखवणारं. विचार तर्कट असतात, कठोर असतात, वडिलांप्रमाणे! भावना समजून घेते, गोंजारते, आईसारखी! म्हणून मन भावनेकडे धावत जातं. मन आसुसलेलं असतं. त्याला काहीतरी हवं असतं. हे काहीतरी काय, हे त्यालाही माहीत नसतं. बऱ्याचदा जे हवं आहे ते हातून निसटून गेलेलं असतं. मग ती एखादी व्यक्ती असू शकते, एखादे स्वप्न, एखादी वेळ असं काहीही. कातरवेळी ही जाणीव टोकाची होते. जे हवंय ते मिळत नाही किंवा मिळणार नाही ह्या जाणिवेने मन हळवं होतं, उदास होतं. कातर होतं!

कातर म्हणजे भयभीत, व्याकुळ, अधीर. खरं तर ती एक शब्दातीत मानसिक अवस्था आहे. संधिकाल, जेव्हा दिवस रेंगाळतोय आणि रात्र अंगावर येते असा काळ. दिवस आणि रात्रीच्या कात्रीमध्ये मन कातरलं जातं. अशा वेळी विकल करणाऱ्या गोष्टींचं हमखास स्मरण होतं. आठवणींचंही एक विलक्षण असतं. त्या कधी दार ठोठावून येत नाहीत. आपण त्यांना बोलावलेलंही नसतं. एखादा वास, एखादं गाणं, एखाद्या रस्त्यावरचं वळण, जुन्या पुस्तकात जपलेलं एखादं फूल असं काहीही निमित्त होतं आणि त्या अलगद वर्तमानात



येऊन बसतात. मग काही क्षणांसाठी काळ मागे फिरतो. आपण पुन्हा त्या घराच्या अंगणात उभे असतो. पुन्हा तोच आवाज ऐकू येतो. पुन्हा कुणीतरी आपल्याला त्याच नावाने हाक मारत असतं. त्या वेळी आपण जे होतो, तेच आपण क्षणभर होऊन जातो. फरक एवढाच की, तेव्हा आपल्याला तो क्षण कधी संपेल याची कल्पना नसते; आता मात्र तो कायमचा निघून गेला आहे, हे माहीत असतं. बहुधा याच जाणिवेतून आठवणी कातर होतात. आठवणी म्हणजे मधाचं पोळं! त्यांच्यात रमणं जितकं मधुर तितकाच त्यांचा दंश जीवघेणा! आठवणी म्हणजे भूतकाळाकडे बघण्याची एक खिडकी, ज्यातून ते क्षण बघता येतात, पण जगता येत नाहीत. यातून एकप्रकारची विफलता आणि औदासीन्य येतं. गुरू ठाकूर यांनी फार सुंदर शब्दात ही अवस्था मांडली आहे.

कातरवेळी बसलो होतो आठवणींचा पिंजत कापूस
तशात पाऊस...
ठुसठुसणारे घाव पुराणे
विस्कटलेले डाव पुराणे
अन् पुराणे काही उखाणे
सुटता झालो उगाच भावुक
तशात पाऊस...
त्यात कुठूनसा आला वारा
कापूस घरभर झाला सारा
पसाऱ्यात त्या हरवून गेलो
कधी अन् कसा कुणास ठावूक
तशात पाऊस...

आधीच कातरवेळ, त्यात पाऊस यावा आणि कहर म्हणजे शेवटी येणारा वारा! आता या पसरलेल्या आठवणीत रमायला झालं तरी त्या आवरून ठेवायला किती कठीण! पाऊस, कापूस, वारा या प्रतिमा प्रतीकात्मक आहेत. पण अवस्थेचं नेमकं वर्णन करणाऱ्या!

निसर्गात जे दृश्य दिसतं त्याचा प्रत्येकाच्या भावविश्वावर वेगवेगळा परिणाम होतो. अनेक कातर क्षणांचं संकलन म्हणजे कवी ग्रेस यांच्या संध्याकाळच्या कविता! आधीच ग्रेसांच्या कविता अनुभवणं म्हणजे निबीड अरण्यातून, गूढ धुक्यातून, अनोळखी तरीही आपल्याशा वाटणाऱ्या वाटेवरून चालणं. कुठे अर्थाच्या खोल दऱ्या असतात, कुठे भावनांची उत्कट शिखरं तर कुठे प्रतिमांचे सुंदर ताटवे असतात. 'वाट' नावाच्या कवितेत ते लिहितात–

तू येशील म्हणून मी वाट पाहतो आहे
तीही अशा कातरवेळी,
उदाच्या नादलहरीसारख्या
संधिप्रकाशात...

हे वाट बघणं चिरंतन आहे, दुःखासारखं! 'उदाची नादलहर' ह्या शब्दापाशी मी थांबले. जेव्हा आपण उद पेटवतो, त्याच्या धुराच्या लहरी हळूहळू पसरत जातात. जसा अंधार चोरपावलांनी भवताल व्यापून टाकतो. नादलहर म्हटलंय. या दृष्टीने इंग्रजीत एक वाचण्यात आलं.

The Sun, the Stars, the Moon, all speaking different languages of light. And still nothing gets lost in translation.

वाटलं उदाची ही सुगंधी अभिव्यक्ती तिची वाणी असू शकते, जिला नाद आहे.

कातरवेळ एकाकी करते. अशा वेळी आपल्याला हव्याहव्याशा माणसाची सोबत हवी असते. म्हणूनच गदिमा लिहितात,

या कातरवेळी
पाहिजेस तू जवळी
शेष तेज वलय वलय
पावे तमी सहज विलय
कसले तरी दाटे भय
येई तूच तम उजळी

लेखक अरविंद गोखले यांची 'कातरवेळ' नावाची कथा

आहे. नुकतंच लग्न झालेली मुलगी काही महिन्यांनी माहेरी येते. सुखवस्तू सुसंस्कृत कुटुंबात तिला दिलेलं. माहेरीही कौतुकाचं वातावरण. दिवसभर नातेवाईक, शेजारी, मैत्रिणी यांच्यासोबत दिवस छान जातो. तिला तिच्या नशिबाचा हेवा वाटू लागतो. ती घरी परतते तेव्हा तिन्हीसांज झालेली असते. घरी कोणीही नसतं आणि त्यावेळी तिला अगदी करमेनासं होतं. त्यावेळी तिला पुसून टाकलेली तिच्या प्रियकराची आठवण येते. आणि ती विचार करते की, या कातरवेळी तो कशाची आठवण करत असेल!

कातर म्हणजे अपूर्णतेची जाणीव. आपण ज्याला धरून ठेवू इच्छितो ते निसटतंय किंवा ते मिळणार नाही ही जाणीव. ही जाणीव, ही हतबलता आपल्याला फार हळवं करते. मन कातर होतं, क्षण कातर होतो, नजर कातर होते आणि आवाजसुद्धा कातर होतो.

कातर हा शब्द 'नाम' म्हणून जेव्हा वापरला जातो तेव्हा मात्र त्याचा शब्दशः अर्थ घ्यावा लागतो.

शब्द हेचि कातर
शब्द सुई दोरा
बेतावेत शब्द
शास्त्राधारे ।

असं संत तुकाराम म्हणतात त्यावेळी शब्द म्हणजे अंतःकरण कापणारे असा होतो.

कातरवेळी जेव्हा भोवताली आणि आत काळोख दाटू लागतो, एकप्रकारची जडता पसरू लागते, त्यावेळी देवाजवळ आपण दिवा पेटवतो. त्या लहानशा दिव्याची स्निग्ध ज्योत बाहेर फार प्रकाश देत नाही, पण अंतःकरण मात्र उजळते.






# 'फ्रिडम ऑन ट्रायल'

**लोकमान्यांचा असा प्रभाव सर्वसामान्य जनतेपुरता मर्यादित नव्हता, तर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यासारख्या प्रभावी नेत्यावर तहहयात होता. त्यातून सावरकरांचे कार्य व न्यायालयीन भूमिका आणि लोकमान्य टिळक यांचे कार्य व न्यायालयीन भूमिका यात कमालीचे साम्य आहे. मदनलाल धिंग्रा यांचे न्यायालयीन भाषण स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनीच तयार केले आहे, ही बाब आता जगजाहीर आहे. त्यामुळे लोकमान्य टिळक, मदनलाल धिंग्रा आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या खटल्यात, भूमिकेत आणि सरकारी पवित्र्यातसुद्धा असणारे साम्य हे पुस्तक वाचताना प्रकर्षाने जाणवते.**

**चन्द्रशेखर टिळक**


९८२०२९२३७६

'भारतीय स्वातंत्र्य लढ्याला वळण लावणारे १२ खटले' असे उपशीर्षक असणारे आकाराने लहान, पण आशयाने वैशिष्ट्यपूर्ण असे अगदी अलीकडेच प्रकाशित झालेले महत्त्वपूर्ण पुस्तक म्हणजे Frerdom on Trial.

आकाश वाजपेयी यांनी लिहिलेल्या या इंग्लिश पुस्तकाचे नाव 'फ्रीडम ऑन ट्रायल' असे आहे. कारण या पुस्तकाचे मूळ सूत्र किंवा मुख्य धागा हा आहे की, आपल्या देशाचा स्वातंत्र्य लढा जसा आणि जितका क्रांतिकारकांच्या साहसी कृत्यातून लढला गेला, महात्मा गांधी प्रणित अहिंसक चळवळीतून लढला गेला, लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या नेतृत्वाने राष्ट्रव्यापी व सर्वसमावेशक चळवळीतून लढला गेला आहे; तेवढाच, तितकाच आणि तसाच ब्रिटिश सरकारने विविध काळात, विविध पातळ्यांवर, विविध कोर्टात, विविध नेत्यांवर गुदरलेल्या खटल्यांवर आधारित असे हे पुस्तक आहे.

एक वाचक म्हणून हे पुस्तक आपण जसजसे वाचत जातो तसतसे आपल्या मनावर या पुस्तकाच्या मूळ किंवा मुख्य शीर्षकांपेक्षा या पुस्तकाचे Twelve Cases That Shaped India's Struggle for Independence हे उपशीर्षक जास्त ठसत जाते. कारण एक सर्वसामान्य वाचक म्हणून आपण या नेत्यांकडे, त्यांच्या कार्याकडे, त्यांच्या या खटल्यांकडे, त्या त्या खटल्यांच्या पार्श्वभूमीकडे, त्या त्या खटल्यात त्या त्या कोर्टात त्या त्या नेत्याने केलेल्या युक्तिवादाकडे किंवा मांडलेल्या भूमिकेकडे, या प्रत्येक खटल्यात तत्कालीन सरकारने केलेल्या चापलुसीकडे आपण या नजरेने पाहिलेलेच नसते याचे भान हे पुस्तकाच्या अक्षरशः प्रत्येक पानावर येत राहते.

लाल किल्ला खटला ( INA case ), महात्मा गांधी, अलिपूर खटला, लोकमान्य टिळक, शहीद भगतसिंग, रामप्रसाद बिस्मिल्ला, अशफाकुल्ला खान, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, बसंत बिस्वास (दिल्ली–लाहोर), सचिंद्रनाथ सन्याल (बनारस), मदनलाल धिंग्रा, उधमसिंग आणि मंगल पांडे अशा १२ खटल्यांची मांडणी या पुस्तकातील १२ प्रकरणांत लेखक आकाश वाजपेयी अत्यंत साक्षेपाने करतात... साक्षेपी संक्षेपाने करतात असे म्हणणे जास्त सयुक्तिक ठरेल, कारण यातला प्रत्येक खटला वाचताना वाचक म्हणून वारंवार असे वाटत राहते की, याबाबत अजून थोडी माहिती या पुस्तकात मिळाली असती तर जास्त चांगले झाले असते. कदाचित Not to ignite; but just to inform असा सावध पवित्रा या पुस्तकाचे लेखक आकाश वाजपेयी यांनी घेतला असावा.




**Freedom On Trial :**
**Twelve Cases That Shaped India's Struggle for Independence.**

लेखक : आकाश वाजपेयी

प्रकाशक : रूपा पब्लिकेशन्स

पाने : २४०, किंमत : ५९५ रुपये

आपल्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश श्री. धनंजय चंद्रचूड यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. त्यातून एक वेगळा दृष्टिकोन वाचकाना जरूर मिळतो. पण आज स्वतंत्र भारतात या विषयाच्या विविध बाजूंचा विचार करताना तत्कालीन सरकार आणि न्यायव्यवस्थेने किती, कसे, कुठे कायदेशीर चौकटीतून न्यायाने किंवा अन्यायाने पाहिले, याबाबत फारसे विवेचन या प्रस्तावनेत वाचकाच्या पदरी पडत नाही.

या दोन गोष्टींमुळे एक मात्र होते की, या पुस्तकात समाविष्ट असलेली सर्व प्रकरणे त्यांच्या त्यांच्या निखळ स्वरूपात तुमच्या माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकांसमोर उभी राहतात आणि त्यातून सगळ्यात महत्त्वाचे मनोमन जर काही अधोरेखित होत असेल, तर हे अधोरेखित होत राहते की, तत्कालीन राज्यव्यवस्थेने तत्कालीन स्वातंत्र्य सेनानींवर न्यायालयातसुद्धा अन्याय केला आहे.

या पुस्तकातून सर्वसामान्य वाचकाला मिळणारा दुसरा संकेत हा आहे की, हे खटले काळाच्या प्रवाहाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर न्यायालयात उभे राहिले गेले असले, लढवले गेले असले तरी सरकारी भूमिका कमालीची सातत्यपूर्ण आहे. Precedence Precedes and Proceeds असे जे न्यायशास्त्राचे (Jurisprudence) चे वर्णन केले जाते ते अशा अन्याय्य पद्धतीनेसुद्धा खरे आहे.

त्याच वेळी या पुस्तकातून, तसा त्याचा उद्देश कदाचित तसा नसेलसुद्धा. जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे, या सर्व खटल्यांत जसे सरकारी भूमिकेत सातत्य आहे तसेच आणि तितकेच आपल्या विविध स्वातंत्र्य सेनानींनी न्यायालयात (आणि बाहेरही) घेतलेल्या भूमिकेत किंवा धोरणात सातत्य आहे. त्यात कालसापेक्ष, स्थितीसापेक्ष, व्यक्तीसापेक्ष बदल आणि बदलाव जरूर आहेत. पण अनेक मुद्द्यांवर कमालीचे साम्य आहे.

लोकमान्य टिळक यांच्यावर भरलेल्या खटल्यांची माहिती या पुस्तकात आहे. तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर आणि मदनलाल धिंग्रा यांच्यावरील खटल्यांची दोन स्वतंत्र प्रकरणे या पुस्तकात आहेत. हे पुस्तक सलग वाचताना मनोमन उभे राहणारे चित्र हे आहे आणि असते की, आयुष्यभर लोकमान्य टिळकांनी केलेला जन व्यवहार आणि त्यामागची तात्त्विक बैठक कमालीची व्यवहार्य आहे. त्या प्रवाहात सर्वसामान्यांना त्यांनी सामावून घेतले आहे. त्याच्याशी प्रामाणिक व एकरूप अशीच भूमिका लोकमान्य टिळकांनी त्यांच्यावरील राजद्रोहाच्या तिन्ही खटल्यांत न्यायालयात घेतली आहे. आधीच टिळकांचा सर्वसामान्य जनतेवर कमालीचा आदर आणि आत्मीयतायुक्त प्रभाव तत्कालीन जनतेवर कमालीचा आहे. याचा प्रचंड धसका तत्कालीन ब्रिटिश राजवटीने घेतल्याने येनकेन प्रकारे लोकमान्यांना तत्कालीन जनतेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न ब्रिटिश राज्यकर्ते न्यायालयाच्या माध्यमातून करत होते.

लोकमान्यांचा असा प्रभाव सर्वसामान्य जनतेपुरता मर्यादित नव्हता, तर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यासारख्या प्रभावी नेत्यावर तहहयात होता. त्यातून सावरकरांचे कार्य व न्यायालयीन भूमिका आणि लोकमान्य टिळक यांचे कार्य व न्यायालयीन भूमिका यात कमालीचे

साम्य आहे.

मदनलाल धिंग्रा यांचे न्यायालयीन भाषण स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनीच तयार केले आहे, ही बाब आता जगजाहीर आहे.

त्यामुळे लोकमान्य टिळक, मदनलाल धिंग्रा आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या खटल्यात, भूमिकेत आणि सरकारी पवित्र्यातसुद्धा असणारे साम्य हे पुस्तक वाचताना प्रकर्षाने जाणवते.

१८५७ च्या आपल्या देशाच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाचा सरताज मंगल पांडे यांचे वर्णन या पुस्तकात तसे सगळ्यात शेवटच्या प्रकरणात येते. पण त्यातून एक होते की, आधीची सारी प्रकरणे वाचून झाल्यामुळे मंगल पांडे यांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी कशी मिळाली नाही याचे स्पष्ट चित्र आजच्या वाचकांसमोर उभे राहते. त्याच वेळी १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाला ब्रिटिशांनी अनुल्लेखाने मारले किंवा त्याची १८५७ चे बंड म्हणून कितीही हाताळणी व हेटाळणी केली तरी त्याची धग पेटती राहील याची पूरेपूर काळजी लोकमान्य टिळक यांनी किती वेगवेगळ्या प्रकारे घेतली आणि त्याचा पुरेपूर वचपा वेळोवेळी तत्कालीन सरकारने कसा घेतला याची उजळणी समंजस वाचक मनोमन नक्कीच करेल... अगदी शब्दानेसुद्धा त्याचा उल्लेख या पुस्तकात नसला तरी!

त्यातून हा इतिहास स्वातंत्र्यवीर सावरकर त्यांच्या '१८५७ चे स्वातंत्र्य समर' या पुस्तकात कसा मांडतात, मंगल पांडे यांना आठवत; पण तसा कुठेही उल्लेख न करता सावरकर जोसेफ माझीनी पुस्तक कसे लिहितात, त्यातूनच काळाच्या ओघात भगतसिंग, मदनलाल धिंग्रा, रामप्रसाद बिस्मिल, अशफाकऊल्ला, बसंत बिस्वास, सचिंद्रनाथ सन्याल, उधमसिंग कसे निर्माण होतात...


यातून ही सारी माणसे काही वाट चुकलेले देशभक्त नक्कीच नव्हते, हे चित्र हे पुस्तक वाचकांसमोर उभे करते. या सगळ्यांनी न्यायालयाचा उपयोग आपले विचार, आपली कृती, आपली भूमिका जनतेपर्यंत पोचवण्यासाठी कसा केला, लोकमान्य टिळक स्वत: (वकील नाही) न्यायालयात सलग २३ तास (सहा दिवस) आपली भूमिका काय आणि का मांडत होते हे स्पष्ट होते.

या अर्थाने या पुस्तकाचे शीर्षक आणि उपशीर्षक... 'भारतीय स्वातंत्र्य लढ्याला वळण लावणारे १२ खटले!' आवर्जून वाचावे, निदान चाळावे असे हे पुस्तक आहे हे निश्चित !

या पुस्तकात कमतरता नाही असे नाही. मुळात ती संबंधित व्यक्ती, तिचा काळ, तिचे कार्य, संबंधित प्रकरण, त्या त्या प्रकरणाची तारीख व वर्ष, निकालाचा काळ याचा त्रोटक असा उल्लेख त्या त्या प्रकरणात आला असता तर आजच्या वाचकाला स्वतःचे संधान त्या विषयाशी जोडणे निश्चितच सोयीचे झाले असते. ही उणीव पुढच्या आवृत्तीत सुधारून घेता आली तर!


विवेक प्रकाशन

धर्म महावीरांचा



भगवान महावीर कोण होते?
जैन परंपरेतील ते कितवे तीर्थंकर होते?
जैन परंपरेत एकूण किती तीर्थंकर होऊन गेले?
भगवान महावीरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान कोणते?
त्यांनी सांगितलेली सूक्ते कोणती?
सर्वोच्च ज्ञानाची प्राप्ती त्यांना कशी झाली?
अशा सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी वाचलेच पाहिजे असे पुस्तक.

पद्मश्री रमेश पतंगे लिखित
'धर्म महावीरांचा'

प्रकाशन : सप्टेंबर २०२४
मराठी - मूळ किंमत : २३०/- रु. । सवलत मूल्य : २०७/- रु.
हिंदी - मूळ किंमत : २६०/- रु. । सवलत मूल्य : २४७/- रु.

भगवान महावीर यांच्या निर्वाणाला या वर्षी २५५० वर्षे पूर्ण होत आहेत. भगवान महावीरांनी सांगितलेले तत्त्वज्ञान हे हिंदू तत्त्वज्ञानच आहे, जे जगाला दिशा देणारे, जगाला संघर्षातून बाहेर पडून शांततामय जीवन जगण्यासाठी प्रवृत्त करणारे आहे.

Accounts Details - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318

संपर्क
९५९४९६१८५८

भगवान महावीर असो, गौतम बुद्ध असो अथवा विवेकानंद असो, या सर्वांचा विचार एकच होता आणि तो म्हणजे 'विश्वकल्याणाचा'. त्यांनी सांगितलेले हे सर्व तत्त्वज्ञान हिंदू तत्त्वज्ञान आहे. म्हणून आपण भगवान महावीरदेखील वाचले पाहिजे.

समग्रतेने महावीरांच्या जीवनाचा आढावा घेणारे मराठीतील हे पहिलेच पुस्तक असेल.
मराठी आणि हिंदी दोन्ही भाषेत हे पुस्तक प्रकाशित होणार आहे.




# भारताचे संविधान
## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन

**या पुस्तकाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे कठीण घटनात्मक विषय सामान्य वाचकाला समजेल अशा पद्धतीने मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न केला गेला आहे. लेखक स्वतः हे पुस्तक सर्वसामान्य नागरिक तसेच सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते यांना डोळ्यांसमोर ठेवून लिहिल्याचे सांगतात. दुसरे महत्त्वाचे बलस्थान म्हणजे, संविधानसभेतील चर्चेचे महत्त्व अधोरेखित करणे. लेखक रमेश पतंगे यांच्या मांडणीनुसार, संविधानसभा ही केवळ राजकीय वादविवादाचे व्यासपीठ नव्हती; विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करणारी आणि राष्ट्रीय प्रज्ञेचे प्रतिनिधित्व करणारी संस्था होती.**

**श्री. प्रकाश वैद्य**

भारतीय संविधानाच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका समजून घेण्यासाठी केवळ त्यांना 'संविधानाचे शिल्पकार' म्हणून गौरवणे पुरेसे नाही; त्यांच्या मागे असलेले राजकीय, सामाजिक आणि तात्त्विक चिंतन समजून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. रमेश पतंगे यांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन' या पुस्तकाचा मुख्य प्रयत्न याच दिशेने जातो. लेखकाच्या मते, संविधान हे केवळ कायद्यांचे संकलन नसून सामाजिक परिवर्तनाचे आणि सत्तेवर अंकुश ठेवण्याचे प्रभावी साधन आहे.

**संविधाननिर्मितीची पार्श्वभूमी**

पुस्तकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखक थेट आंबेडकरांच्या विचारांकडे न जाता आधी संविधाननिर्मितीची प्रक्रिया आणि तिची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करतात. अमेरिकन संविधान, ब्रिटिश संसदीय परंपरा आणि भारतीय संविधानसभा यांचा संदर्भ देत भारतीय संविधानाची निर्मिती कशी झाली, हे समजावून सांगण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

संविधानसभा– संविधान ग्रंथस्वरूपात येण्यासाठी महत्त्वाच्या कायदेतज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली होती. त्यापैकी कायदेतज्ज्ञ बी. एन. राऊ यांनी तयार केलेला प्रारूप मसुदा आणि त्यानंतर मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून आंबेडकरांनी केलेले काम यावरही पुस्तकात प्रकाश टाकलेला आहे.

यामुळेच आंबेडकरांचे योगदान एखाद्या व्यक्तीपुरते मर्यादित न ठेवता संविधाननिर्मितीच्या व्यापक प्रक्रियेच्या संदर्भात पाहण्याची संधी वाचकाला मिळते.

**आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन**

पुस्तकाचा केंद्रबिंदू आहे. आंबेडकरांचे संविधानाविषयीचे चिंतन उल्लेखनीय आहे. संविधानाची निर्मिती करताना समता,

स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, मूलभूत अधिकार, लोकशाही आणि राज्यसत्तेवर नियंत्रण या मूल्यांकडे अभ्यासक या नात्याने आंबेडकरांनी कशा दृष्टीने पाहिले, याचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखक करतात.

विशेषतः संविधान हे राजसत्तेला अनिर्बंध अधिकार देणारे साधन नसून तिच्यावर घटनात्मक मर्यादा घालणारे माध्यम आहे, ही भूमिका पुस्तकात अधोरेखित होते. लेखकाने आंबेडकरांच्या संविधानविषयक विचारांना सामाजिक क्रांतीच्या संदर्भात मांडले आहे.




**पुस्तकाचे बलस्थान–**

या पुस्तकाची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे कठीण घटनात्मक विषय सामान्य वाचकाला समजेल अशा पद्धतीने मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न केला गेला आहे. लेखक स्वतः हे पुस्तक सर्वसामान्य नागरिक तसेच सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते यांना डोळ्यांसमोर ठेवून लिहिल्याचे सांगतात.

दुसरे महत्त्वाचे बलस्थान म्हणजे, संविधानसभेतील चर्चेचे महत्त्व अधोरेखित करणे. लेखक रमेश पतंगे यांच्या मांडणीनुसार, संविधानसभा ही केवळ राजकीय वादविवादाचे व्यासपीठ नव्हती; विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करणारी आणि राष्ट्रीय प्रज्ञेचे प्रतिनिधित्व करणारी संस्था होती.

पुस्तकाचे परीक्षण करताना त्यांच्या वैचारिक भूमिकेचाही विचार करणे अत्यावश्यक आहे. पतंगे हे दीर्घकाळ सामाजिक–वैचारिक लेखन करणारे लेखक असून त्यांच्या मांडणीवर विशिष्ट राष्ट्रवादी वैचारिक दृष्टिकोनाचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे हे पुस्तक आंबेडकरांच्या विचारांचे पूर्णतः तटस्थ किंवा सर्वसमावेशक शैक्षणिक विश्लेषण म्हणून वाचण्याऐवजी एका विशिष्ट वैचारिक चौकटीतून केलेले आंबेडकरांच्या जाज्वल्य विचारांचे पुनर्वाचन म्हणून वाचणे अधिक योग्य ठरेल.

आंबेडकरांच्या जातिव्यवस्थेविषयीच्या मूलभूत भूमिकेचा, हिंदू सामाजिक व्यवस्थेवरील त्यांची चिकित्सा, अल्पसंख्याकांचे प्रश्न, प्रतिनिधित्व, बौद्ध धर्माकडे त्यांचा झालेला प्रवास अशा व्यापक विचारविश्वाचा अधिक सखोल संबंध संविधानविषयक चिंतनाशी जोडला गेल्याने पुस्तकाची व्याप्ती आणखी समृद्ध झाली आहे.

तसेच, संविधानाच्या निर्मितीत आंबेडकरांचे योगदान निर्विवादपणे महत्त्वाचे असले तरी संविधान हे केवळ एका व्यक्तीचे निर्माणकार्य नव्हते. संविधानसभा, विविध समित्या, बी. एन. राऊ, के. एम. मुन्शी, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद आणि इतर अनेक सदस्यांचे योगदानही तितक्याच चिकित्सकपणे समोर आणणे आवश्यक आहे. पुस्तकात या प्रक्रियेचा संदर्भ आहे; मात्र आंबेडकरकेंद्री मांडणीमुळे काही वेळा व्यापक सामूहिक प्रक्रिया दुय्यम ठरते.

**आजच्या काळातील महत्त्व**

आज संविधानाविषयी सार्वजनिक चर्चेत अनेकदा संविधानात असणाऱ्या कलमांपेक्षा राजकीय दावे, गैरसमज या विषयीची माहिती लेखकाने पुस्तकात मांडली आहे. संविधानाची निर्मिती, त्यामागील विचार आणि आंबेडकरांचे घटनात्मक तत्त्वज्ञान सामान्य वाचकांपर्यंत पोहोचविणारे हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरते.

लेखकाने विशेषतः कलम २१ आणि मूलभूत अधिकारांच्या स्वरूपाकडे लक्ष वेधले आहे. मूलभूत अधिकार हे निरंकुश नसून त्यांना घटनात्मक मर्यादा आहेत, ही बाबही पुस्तकाच्या विवेचनात ठळकपणे मांडली आहे.

**निष्कर्ष–**

एकूणात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन' हे आंबेडकरांच्या घटनात्मक भूमिकेची प्राथमिक ओळख करून घेऊ इच्छिणाऱ्या वाचकांसाठी उपयुक्त पुस्तक आहे, हे निश्चित! संविधानसभा, संविधाननिर्मितीची प्रक्रिया आणि आंबेडकरांचे योगदान यांचा सुसंगत परिचय हे त्याचे महत्त्वाचे योगदान म्हणता येईल.

मात्र, आंबेडकरांचे संपूर्ण राजकीय–सामाजिक तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी हे पुस्तक एकमेव संदर्भग्रंथ मानता येणार नाही. त्याबरोबर आंबेडकरांचे मूळ लेखन आणि विविध विद्वानांचे चिकित्सक अभ्यास वाचणे आवश्यक ठरेल. त्यामुळे या पुस्तकाचे मूल्यांकन करताना त्याची वैचारिक भूमिका लक्षात घेऊन, त्याला 'आंबेडकरांच्या संवैधानिक विचारांचे एका विशिष्ट दृष्टिकोनातून केलेले सुबोध विवेचन' असे म्हणणे अधिक सयुक्तिक ठरेल. या पुस्तकातून विषयाची उपयुक्तता अत्यंत चांगल्याप्रकारे, सामान्य वाचकांसाठी शैक्षणिक / चिकित्सकरीतीने सर्वसमावेशकपणे पुस्तकात केली आहे.

*पालघर जिल्हा मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष*




# रंगनायिका :
## सामाजिक चिंतनाचा मौलिक दस्तावेज

**डॉ. लिंबेकरांनी या ग्रंथात जवळपास पन्नासहून अधिक नाटकांचा विस्तृत परामर्श घेत मानसिक, सामाजिक, कौटुंबिक आणि सांस्कृतिक प्रवाहातून जगणाऱ्या स्त्री जीवनाच्या विविध पैलूंची कसदार मांडणी केली आहे. सखाराम बाईंडर, गिधाडे, वासनाकांड, जोडीदार, माझा खेळ मांडू दे, चारचौघी, सावित्री, अभिनेत्री, चंद्र जिथे उगवत नाही, पुरुष, शांतता कोर्ट चालू आहे, गार्बो यांसारख्या अनेक नाटकांमधून या नायिकांचे वेगवेगळे पट उलगडताना त्यांचं भावविश्व, जगणं, त्यांचा संघर्ष, भूमिका, अपेक्षा, स्वप्न, तडजोड, ससेहोलपट, कुचंबना अशा विविध अंगांना स्पर्श केला आहे.**

**विजय पाटील**

९८२२०२०५०४

नाट्य साहित्यातील अनेक नाटके ही केवळ वाचली जात नाहीत तर ती संवादी असतात. वाचकाला थांबवून विचार करायला लावतात आणि आपल्या सामाजिक जाणिवांचा नव्याने वेध घ्यायला भाग पाडतात. या सामाजिक जाणिवेतूनच दुःख, वेदना, भावना आणि अपेक्षांचे महत्त्व अधोरेखित होत असतं. अशाच अपरिमित दुःखाचे ओझे वाहत, स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेत जगणाऱ्या रंगनायिकांच्या अंतर्मनातील वेदना, संघर्ष आणि आत्मभानाचा प्रवास डॉ. अशोक लिंबेकर यांनी 'रंगनायिका' या नाट्य समीक्षात्मक ग्रंथातून अत्यंत संवेदनशीलतेने मांडला आहे.

डॉ. लिंबेकरांनी याआधी संत साहित्य, ललित गद्य, ललित लेखसंग्रह, कादंबरी आदी साहित्यावर विपुल असे लेखन केलेले आहे. '१९६० नंतरच्या मराठी नाटकातील स्त्री चित्रण' हा त्यांच्या पीएच.डी. संशोधनाचा विषय राहिलेला असून त्यावर आधारित 'रंगनायिका' हा त्यांचा नाट्य समीक्षात्मक ग्रंथ म्हणजे स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वातील परिवर्तन, तिच्या भावविश्वातील गुंतागुंत आणि सामाजिक वास्तव यांचा वेध घेतो.


भारतीय रंगभूमीला अत्यंत समृद्ध व प्रदीर्घ परंपरा लाभली असून, मराठी रंगभूमीचा १८४३ साली 'सीता स्वयंवर' या नाटकापासून सुरू झालेला हा रंगप्रवास आजही नव्या विचारांनी समृद्ध होत आहे. मराठी माणसाच्या सांस्कृतिक व सामाजिक जीवनावर नाट्यकलेने प्राचीन काळापासून प्रभाव टाकलेला आहे; त्यामुळे महाराष्ट्राचे सांस्कृतिक कलासंचित म्हणूनच या कलेकडे पाहिले जाते. व्यावसायिक, प्रायोगिक,

कामगार, हौशी अशा विविध दालनांनी मराठी रंगभूमी समृद्ध झाली आहे. या रंगभूमीने रसिकांचे केवळ रंजनच नाही तर समाजाला जागृत करण्याचे काम केले आहे. कारण समाजात घडणाऱ्या अनेक घटनांचं प्रतिबिंब हे साहित्यातून अनेकदा समोर येतं असतं.

डॉ लिंबेकरांनी १९६० नंतरच्या नाटकातील स्त्री चित्रण रेखाटताना तत्पूर्वीची राम गणेश गडकरी, आचार्य अत्रे, मामा वरेरकर यांच्या एकच प्याला, प्रेम संन्यास, पुण्यप्रभाव, साष्टांग नमस्कार, लग्नाची बेडी, कुलवधू अशा अनेक स्त्रीवादी आणि स्त्रीकेंद्री नाटकांतून संस्कृतीनिष्ठ, समर्पणशील, आदर्श परंपरावादी स्त्रीदर्शन या नाटकांतून घडते. परंतु हीच स्त्री १९६० नंतरच्या नाटकांमध्ये बंडखोर नायिकांच्या आविष्काराची आवृत्ती म्हणून समोर येते.

काळाच्या बरोबर वाटचाल करणाऱ्या या रंगनायिका ज्या नाटकातून अभिनित झाल्या त्यांनी पारंपरिक संकेतांना नाकारून नवतेचा प्रवास करताना त्यांच्या आविष्काराने मराठी नाटकांना एक नवे परिमाण लाभले. या नाटकातील स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुःख, एकाकीपण, 'स्व'च्या शोधासाठी निघालेल्या नायिकांचा प्रवास या सगळ्या मुद्द्यांचा परामर्श घेताना प्रामुख्याने लक्षात येते की, एकमेकांवरील विश्वास ज्यामुळे मानवी संबंधाला एक वेगळा अर्थ प्राप्त होतो. परंतु हा विश्वास जेव्हा डळमळतो, तिथे नात्यांना छेद लागतो आणि त्यानंतर स्त्रीच्या अध:पतनाची, अधोगतीची, शोकात्मतेची सुरुवात होते. नाटकातील बहुतांश नायिका या अविश्वास, असमानता, पुरुषी अहंकार, गृहीत धरणे यामुळे पुरुषप्रधान व्यवस्थेच्या बळी ठरलेल्या आहेत.

कोणतेही परिवर्तन हे आकस्मित होत नाही, तर बदलांच्या अनेक टप्प्यांना पार करत हे परिवर्तन होत असते. पावित्र्याच्या, साधनसूचितेच्या अपेक्षा फक्त स्त्रियांकडूनच केल्या जातात.




आपल्या व्यवस्थेने तिच्याकडे केवळ वंशवृद्धीचे, कुटुंबव्यवस्थेचे प्रतीक म्हणून पाहिले. तिच्यावर अनेक सामाजिक, धार्मिक आणि नैतिक बंधने लादली गेलीत. परंतु तिच्या मनाचा, भावनेचा, शरीराचा विचार कधीच झाला नाही. तिचे कुटुंबातील, समाजातील स्थान, तिचं दुःख आणि तिच्या समस्यांविषयीचे नाटकातील दर्शन हे अंतर्मुख करायला लावते. पुरुषांनी केलेल्या प्रतारणेविरुद्ध ज्यांनी विरोध केला, लढा दिला, संघर्ष केला, त्यामध्ये काहींचे कुटुंब, संसार आणि जीवनही उद्ध्वस्त झाले, काही विभक्त झाल्या, तर काहींनी आत्महत्या केल्या. स्त्री जीवनाचे हे पैलू, हे दुःख अत्यंत वेदनादायी आहे.

डॉ. लिंबेकरांनी या ग्रंथात जवळपास पन्नासहून अधिक नाटकांचा विस्तृत परामर्श घेत मानसिक, सामाजिक, कौटुंबिक आणि सांस्कृतिक प्रवाहातून जगणाऱ्या स्त्री जीवनाच्या विविध पैलूंची कसदार मांडणी केली आहे. सखाराम बाईंडर, गिधाडे, वासनाकांड, जोडीदार, माझ्या खेळ मांडू दे, चारचौघी, सावित्री, अभिनेत्री, चंद्र जिथे उगवत नाही, पुरुष, शांतता कोर्ट चालू आहे, गार्बो यांसारख्या अनेक नाटकांमधून या नायिकांचे वेगवेगळे पट उलगडताना त्यांचं भावविश्व, जगणं, त्यांचा संघर्ष, भूमिका, अपेक्षा, स्वप्न, तडजोड, ससेहोलपट, कुचंबना अशा विविध अंगांना स्पर्श केला आहे.

काळाच्या सोबत चालणारे, वाटचाल करणारे साहित्य हे नेहमी काळाशी आपले नाते जोडत असते. संवादी राहते. जसा काळ बदलतो त्यानुसार साहित्याचे स्वरूप त्याची आविष्कार पद्धती, भाषा आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे साहित्यातून प्रकट होणारे जीवनदर्शनही बदलते याची जाणीव हा ग्रंथ वाचताना होतो.

काळासोबत माणसे किती बदलली, अनेक आव्हाने आली, तांत्रिक-यांत्रिक आक्रमणे झाली, हाच धागा पकडत


**सरसरता साहित्य पत्रिकेसाठी लिहिते व्हा...**

आपल्या कथा, कविता, ललित निबंध, प्रवास वर्णन इ. साहित्य समरसता साहित्य पत्रिकेत प्रकाशित करू शकता. आपले साहित्य संपादक समरसता साहित्य पत्रिका १/६ जैन इस्टेट, विलेज रोड, भांडूप (प.), मुंबई - ७८ या पत्त्यावर पाठवावे.

विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, जयवंत दळवी, वसंत कानिटकर, मधुसूदन कालेलकर, रत्नाकर मतकरी, श्री. ना. पेंडसे, विजया मेहता यासारख्या नाटककारांनी नाटकातून अभिव्यक्तीच्या नव्या शक्यतांना आविष्कृत केले. परंपरागत सांकेतिकतेला नकार देऊन नवी मांडणी आणि स्त्री स्वातंत्र्याच्या अस्मितेच्या आणि स्त्री जाणिवेच्या विषयांना स्पर्श करत प्रेक्षकांना नाटकाकडे पाहण्याची नवी आणि अभिनव दृष्टी दिली. १९६० नंतरच्या नाटकातील नायिकांचा प्रवास म्हणजे 'स्व'च्या शोधात प्रस्थापित संकेतांना नकार देत आत्मभान आणि स्वातंत्र्याचा उद्घोष करणाऱ्या या रंगनायिका त्या काळातील मैलाचा दगड ठरल्या आहेत.

अंजनी, रूपा, माधवी, सावित्री आणि गार्बो सारख्या अनेक नायिका आपलं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी परिणामांची पर्वा न करणारी बंडखोर स्त्री म्हणून वावरते. परंतु अनोख्या जगात पाय रोवण्यासाठी आपले स्वत्व बाजूला ठेवून, आकर्षणाला बळी पडत, आपला विवेक हरवून क्षणिक सुखाला बळी पडतात. अविचारी, अनैतिकेच्या मार्गावर जाताना सावित्री ही पती, कुटुंब यांचा आधार गमावते आणि एकाकी जीवन जगते. परिणामी ती आत्महत्या करते. या उलट 'पुरुष'मधील अंबिका ही तिच्यावर गुलाबरावसारख्या बड्या असामीकडून बलात्कार होतो. परंतु सर्व शक्तीनिशी लढा देणारी ही नायिका त्याला कठोर शिक्षा करते आणि न्यायव्यवस्था व समाज व्यवस्थेला प्रश्न विचारते. परंतु तरीदेखील स्त्री मनाच्या पावित्र्याचा विचार समाज करत नाही. याचाच अर्थ स्त्रीच्या देहाचाच विचार पुरुषी मनात आणि पुरुषप्रधान व्यवस्थेत प्राधान्याने केला जातो आणि म्हणून यातून नेमकं भ्रष्ट म्हणजे काय? असा प्रश्न समोर येतो. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये पुरुषांना सर्व गुन्हे, सर्व चुका माफ असतात. परंतु स्त्रियांना मात्र त्याची किंमत चुकवावी लागते हे वास्तव या नाटकांतून समोर येते.

विजय तेंडुलकर म्हणजे काळाच्या पुढचे पाहणारे, दूरदृष्टी आणि एक प्रयोगशील नाटककार असून, प्रायोगिक मराठी रंगभूमीवर सर्व पारंपरिक संकेतांना अव्हेरून चाकोरीबाहेर जाऊन मराठी नाटक रंगभूमीवर साकारणारे विद्रोही नाटककारांमध्ये त्यांचे स्थान महत्त्वपूर्ण ठरते. शेवटी नाटक म्हणजे 'ड्रामा इज अ मिरर ऑफ लाइफ' असंदेखील म्हटलं जातं आणि वसंत कानेटकरांच्या शब्दात सांगायचं झालं तर 'नाटक म्हणजे द्वंद्व होय.'

या नाटकातील रंगनायिकांचा संघर्ष हा घरापासून सुरू होऊन शेवटी तीच्या वाट्याला आलेल्या एकाकीपणावर, शोकात्मतेवर येऊन थांबतो. कारण हा संघर्ष व्यक्ती विरुद्ध व्यक्ती, व्यवस्था आणि परिस्थिती अशा अनेक मार्गांने सुरू असतो. या संघर्षातून रंगनायिकांचा जीवन प्रवास वाचताना स्त्रीच्या अंतर्भाह्य मनातील भावभावनांचे, अपेक्षांचे, कृतीचे, शोकात्म जगण्याचे आणि उद्ध्वस्त झालेल्या स्वप्नांचे यथार्थ दर्शन घडते. पद्मगंधा प्रकाशनाने प्रकाशित केलेला हा ग्रंथ वाचताना मनामध्ये अनेक प्रश्न रेंगाळतात. त्यामुळे हा ग्रंथ म्हणजे सामाजिक चिंतनाचा मौलिक असा दस्तावेज आहे.






# 'सप्तरंगी भावनांचे काव्यचित्र'

**अशोक भिंगार्डे**

६

कोणत्याही लेखकाने लिहिलेले साहित्य हे रसिकांसाठी केवळ ज्ञान आणि मनोरंजनापुरते मर्यादित नसते. तो एक अभ्यास असतो. अभ्यास म्हटला की व्याख्या, रंजकता, अलंकार यांसह समीक्षात्मक तुलना आणि विशिष्ट संकलित भावनांचा मनावरील प्रभाव इत्यादींचे विश्लेषण येते.

विल्यम वर्ड्स्वर्थ यांनी कवितेची व्याख्या करताना–

Poetry is the spontaneous overflow of powerful words.

कविता म्हणजे, शक्तीशाली भावनांचा उत्स्फूर्त ओघ. ती शांततेत आठवलेल्या भावनेतून उद्भवते अशी व्याख्या केली आहे.

सौंदर्यशास्त्राच्या (Aesthetics) दृष्टिकोनातून, कविता ही केवळ शब्दांची मांडणी नसून, नादमाधुर्य, लय, प्रतिमा आणि अलंकारिक भाषेचा वापर करून मानवी भावना, अनुभव व विचार व्यक्त करणारी एक कलात्मक रचना आहे.

'कवेत विसावल्या तारका' हा कवी कमलाकर राऊत यांचा नवीन कवितासंग्रह माझ्या हाती आला आणि तो वाचतानाच माझ्या मनात आलेल्या भावनांचा तार्किक आढावा घेण्यास मी प्रवृत्त झालो.

कवी राऊत यांचे याआधीचे 'निनाद अंतरीचा' हा कवितासंग्रह आणि 'संगीत श्रावणाचे' हा गझल संग्रह हे दोन संग्रह वाचनात आले होते. यामधून आशय, अभिव्यक्ती, नाद माधुर्य, लय इत्यादींवर कवी कमलाकर राऊत यांचे निर्विवाद वर्चस्व आहे हे प्रकर्षाने जाणवते. साधे, सहज, सुलभ शब्द हे कवी कमलाकर राऊत यांचे वैशिष्ट्य आहे. वळणा वळणाच्या नदीनाल्यांचे राऊत यांना आकर्षण आहे. परंतु त्यांची कविता वळणे घेत अवतरत नाही. ती सरळ धडक मारत अंगावर येते.

**या कवितासंग्रहतील 'प्रीतरंग' या विभागात कवितांची संख्या अन्य विभागांतील कवितांपेक्षा अधिक आहे. सर्वसामान्यपणे एखाद्या सामान्य माणसाचे आयुष्य माणसाच्या वास्तविक जगण्याकडून आध्यात्मिक जगण्याकडे जात असते. कवी किंवा साहित्यिक या बाबतीत जास्त समृद्ध असतो. 'प्रीतरंग' या विभागातील 'रोज रोज'ही कविता अशा प्रकारची आहे असे वाटायला लागते. त्यातील 'युगानुयुगे तुझा ठाव लागला नाही' या ओळीवरून याची प्रचीती येते.**

त्यामुळे ती येताना अगोदर संभ्रम आणते आणि जेव्हा आपण तिच्या आस्वादासाठी तयार होतो, तेव्हा मग ती आपलीशी वाटायला लागते.

'कवेत विसावल्या तारका' या नावाबद्दल एक वैशिष्ट्य मला समजले ते म्हणजे, या शीर्षकातील प्रत्येक शब्दाचे आद्याक्षर घेतल्यास कविता हा शब्द तयार होतो, कवितेवरची निष्ठा यातून प्रगट होते. कमलाकर राऊत यांच्या दृष्टीने कुटुंबाचे या कवितेशी अतूट नाते आहे. हे त्यांच्या अर्पण पत्रिकेमधून आणि त्यांच्या मनोगतातून प्रकर्षाने जाणवते.

कमलाकर राऊत यांच्या साहित्याचे अवकाशही प्रचंड मोठे आहे. त्यातही भावभावनांची, शब्दबंधाची, नात्यागोत्यांची, मैत्रीची प्रचंड गुंतागुंत आहे. त्याचा नेमका वेध घेणे कुणालाही अशक्य आहे. श्री. राऊत या भाव–भावनांच्या विवरांमध्ये उतरून त्याचे अंतरंग ढवळून काढत मनाची मुशाफिरी सुरू ठेवतात, त्यात ते यशस्वी होतात, तर कधी कधी न सापडलेली उत्तरे शोधताना अस्वस्थ होत 'स्व'लाच प्रश्न विचारून निराश होतात. या मुशाफिरीत भेटलेल्या व्यक्तिमत्त्वांची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करतात आणि व्यवहाराच्या अभ्यासातून मिळालेल्या ज्ञानाचे विश्लेषण करण्यासाठी कवी अंतर्मुख होतात आणि इथेच सुंदर कविता तयार होत जाते. प्रत्येक व्यक्तीची अवस्था येथे प्रगट होते.

या संग्रहातील कवितांचे राऊत यांनी मनरंग, स्त्रीरंग, वर्षारंग, प्रीतरंग, अस्मितारंग, व्यक्तीरंग आणि समाजरंग असे सात विभाग केले आहेत. आजवर मराठीत प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहांमध्ये अशा पद्धतीने काव्यलेखन केलेले आढळत नाही. मराठी कवितेमधील हा नवीन प्रयोग आहे आणि तो वैशिष्ट्यपूर्णही आहे.

कमलाकर राऊत यांनी मनोगतात सांगितलेले विविध संदर्भ देऊन आपल्या संस्कृतीतील सात या अंकाचे महत्त्व विशद केले आहे. मुखपृष्ठावरील सप्तर्षींचे चित्रण आणि संग्रहातील सप्त विभाग यांचा अर्थाअर्थी संबंध सात या अंकापुरताच मर्यादित असावा. तरीही संग्रहातील कवितेचे सात विभाग हे इंद्रधनुच्या सप्तरंगाच्या जवळ जाऊन आशय, अभिव्यक्ती व्यक्त करतात, कारण इंद्रधनुच्या सात रंगासारखे मानवी भावभावनांचे विविध कंगोरे या कवितांतून चितारलेले दिसतात.

'मनरंग' या पहिल्या विभागातून 'मन' या पहिल्याच कवितेत कवींच्या विचारांची झेप अंतराळातून जमिनीवर, सागरावरून सरितेकडे, तमातून प्रकाशाकडे आणि शब्दातून गंधाकडे धावते. कवीच्या मनातील भावभावनांचा उद्रेक हा जगाकडे डोळसपणे पाहण्याच्या, त्यांच्या व्यावहारिक तर्क वितर्कांचा अर्क आहे. नात्यातील, इष्ट मित्रांतील डावे–उजवे अलगदपणे, हळुवारपणे समजून घेत, कुणालाही न दुखावता त्यावर फुंकर मारून पुढे जाणे ही कला राऊत यांनी कष्टसाध्य करून घेतलेली निदर्शनास येते.

'मनी माणसाच्या दुःख एक दाटे
आपलाही येथे परकाच वाटे'

ही खंत मनाशी बाळगून त्याचे विश्लेषण कवी करू लागतो. परंतु उत्तर मिळण्याऐवजी खंत वाढत जाते. स्वार्थाच्या बाजारात माया, स्नेह, प्रेम हे उरलेले नाही हे भीषण सत्य समोर दिसते. दुसऱ्याच्या वाटेवर काटे पसरून ठेवणारी जमात वाढीस लागलेली आहे, हे सांगताना आपण कलियुगात वावरतो आहोत याची जाणीव आपोआप होते.

पृथ्वीवरून दिसणाऱ्या अवकाशासारखे मनाचे अंतरंगही अथांग आहे. त्याचा नेमका अर्थ लावणे कठीण असते. म्हणून कमलाकर राऊत यांच्यातील कवी 'स्व'ला विचारतो.

'शोधावे कुठे त्या निर्मळ जलाला
पडती तडे ते मनाच्या तळाला'


आणि याचेही उत्तर मिळत नाही. उत्तरासाठी मनाच्या तळाला खोदताना पडलेले तडे मात्र दिसू लागतात. प्रेम, स्नेह आणि माया यांना 'निर्मल जळाची' ही उपमा आणि मनाच्या तळात पडलेले तडे या परस्पर विरोधी उपमांचे वास्तव अस्वस्थ करत असताना यालाच प्राक्तनाचे भोग समजून पुन्हा 'स्व'ची समजूत काढतात.

जीवनाच्या वाटेवर मिळालेले दुःख अपरिमित आहे. विहिरीच्या तळात पावसाअभावी पाण्याचे झरे आटावेत आणि सुकलेला तळ दिसावा तसेच काहीसे हल्ली माणसामाणसातील नात्यामध्ये झालेले आहे. माणुसकीचा झरा आटून मनाच्या तळाला पडलेले तडे स्पष्ट दिसायला लागले आहेत. मग अशा वाटेवर भलेपण शोधण्यासाठी आपण धडपड करावी आणि त्यातून फक्त उपहास, अट्टहास आणि कोरडा दिलासा दिसावा. मतलबी दुनियेची उघडी व वास्तव रूपे समोर यावीत अशी परिस्थिती वाट चालताना दिसू लागते अन् मग आपण या वाटेवर का चालतो, असाही प्रश्न ते विचारतात आणि उत्तर मिळत नाही म्हणून–

'वाटेत चालताना का पोळतो कळेना
माझ्याच प्राक्तनाचे मज गूढ आकळेना'

असेही प्रांजळपणे कबूल करतात.

मनाचा विचार करताना, माणसाचा विचार ज्याच्या त्याच्या नजरेतून कवी करताना दिसतात. विविध व्यवहारांतून माणूस




**'कवेत विसावल्या तारका' (कवितासंग्रह)**
कवी :- कमलाकर राऊत,
प्रकाशक :- शारदा प्रकाशन, ठाणे,
मुखपृष्ठ :- प्रकाश पाटील
पृष्ठ संख्या :- १७६, मूल्य : - रु. २५०/-

शोधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो आणि तो शोध पुरा होत असताना ते एका निष्कर्षाप्रत येताना दिसतात. त्यातून त्यांची कविता जन्म घेते.

आपण जिला आपली व्यक्ती समजतो तीच व्यक्ती तिच्या वागण्यामुळे परकी वाटू लागते ही खंत मनाशी बाळगून याचे विश्लेषण कवी करू लागतो. मनाचे अंतरंगही समोर दिसणाऱ्या अनंत अवकाशासारखे अथांग आहे. त्याचा नेमका अर्थ लावणे कठीण असते.

माणसाला येणाऱ्या आठवणी ह्या बऱ्यावाईट कशाही असतात. समाज, नातेवाईक यांच्याकडून आपण बरेच काही शिकतो. चांगले-वाईट अनुभव घेतो. अशा वेळी कवीचा दुर्दम्य आशावाद-

'घेऊ कवेत आता त्या साजिऱ्या क्षणांना'

असा युक्तीवाद करतो तर लगेच दुसऱ्या ओळीत

'ठेवू सदा मनीच्या कैदेत आठवांना'

ही ओळ लिहून जातो. सर्वसामान्यपणे आठवणी कशाही असल्या तरी, सुखदुःखाच्या अशा दोन्ही प्रकारच्या या आठवणींसाठी 'घेऊ कवेत आता त्या साजिऱ्या क्षणांना' हे कवीचे म्हणणे लक्षात घेता, कवीचा सकारात्मक युक्तीवाद भावतो, परंतु त्याच वेळी या आठवांना कैदेत ठेवण्याची इच्छा कवी प्रदर्शित करतो हा विरोधाभास संभ्रमित करतो. कारण आठवणी दोन्ही प्रकारच्या असतात आणि एखाद्या निवांत क्षणी त्या उचंबळून येतात. त्यामध्ये फक्त सुखाच्याच आठवणी असतील असे गृहीत धरून चालत नाही. स्वाभाविकच मग त्या तसल्या आठवणींची मनावर भळभळणारी जखम त्रस्त करून सोडते आणि ही जखम कुणालाही नको असते. या कवितेप्रमाणेच 'वाटेत चालताना...' या कवितेत-

'हाती नसे कुणाच्या जन्मेल कोण कोठे
साधून वेदनेला अंगात रक्त गोठे
राहून संगतीला का, दूर तू कळेना
माझ्याच प्राक्तनाचे मज गूढ आकळेना...'

या ओळी वाचल्यावर पुन्हा संभ्रमित व्हायला होते. संपूर्ण कविता प्रश्नचिन्हांकित आहे. परंतु चालणे म्हणजे हा जीवनाचा प्रवास आहे. यात बाल्य, तारुण्य आणि अखेर प्रौढत्व आलेले आहे आणि ही वाट चालताना सर्व माणसे एकत्र दिसत असली तरी सर्वच एकमेकांपासून दूर झालेले आहेत. म्हणून कवी म्हणतो की, एकत्र राहिले तरी तू दूर दूर का आहेत? आणि हे कोडे शेवटच्या ओळीत सोडवलेले दिसते. तरीही कविता मनाला चुटपूट लावते, हुरहूर लावते. वाचक संभ्रमित होतो, परंतु अस्वस्थ होत नाही. मला वाटते राऊत यांच्या कवितेचे हे मर्म आहे.

जीवनाचे अंतीम सत्य मृत्यू आहे, याची पक्की खूणगाठ मनाशी बांधून असलेला हा कवी 'आयुष्यात चांगले केले, चांगले करुया' या सकारात्मक भावनेशी एकरूप होऊन राहतो. म्हणून या मातीशी कायम इमान राखतो, हे 'प्रौढ झालो' ही कविता वाचताना जाणवते. भलेबुरे अनुभव गाठीशी असले तरी फक्त चांगले स्मरून आयुष्य कंठीत जात राहावे. 'मिळाले आहे त्याचे कौतुक नको किंवा मिळाले नाही त्याची खंत नको' असे म्हणत आनंद लुटीत राहावे, आनंद वाटत राहावे, यापेक्षा सुख वेगळे नाही याची पुरेपूर जाणीव कवीला आहे, याची प्रचीती त्यांच्या कवितेतून आणि वागण्यातूनही येते.

'सांज पसरली' या कवितेतून कवी म्हणतो,

'सांज पसरली धरतीवरती, परी न सरली आस
उंच उंच होत चालली, आठवणींची रास'

या कवितेतून सांज या शब्दाची सांगड पुन्हा आयुष्याशी घालून वृद्धत्वाकडे झुकत चालल्याची जाणीव होऊ लागली तरी आस सरली नाही. ही आस जगण्याची आहे. जीवनामध्ये आलेल्या बऱ्यावाईट क्षणाच्या आठवणींची रास मोठी होत चाललेली आहे आणि त्यातील काही चांगल्या आठवणींचे स्मरणच करून कवी जीवन जगत आहे. या कवितेतून जीवन नश्वर आहे, त्याचा अंतीम टप्पा हा मृत्यू आहे. तेव्हा जाण्याआधी जगण्यातून जमेल तेवढा पुण्यसंचय करावा, ही संतवाणी मनाशी बिंबवीत त्यांनी आपल्या आयुष्याची दिशा ठरवून ठेवलेली आहे. आणि समस्त जनांनी ती स्वीकारून आपल्याही आयुष्याचे सार्थक करावे हा संदेश ही कविता देते.

'प्रभात ओली, रम्य फुलांची
बहरून आली बाग,
रवि येता प्राचीवरती
आली कळ्यांना जाग,
भ्रमरासंगे पाकळ्यांचे
श्वासात गुंतले श्वास'

या ओळी वाचल्यावर एकीकडे वृद्धत्वाची जाणीव दुसरीकडे तारुण्याचा उन्माद यांच्या सीमारेषेवर चाललेल्या स्वीकार–अस्वीकाराचे द्वंद्व कवीला अस्वस्थ करते. निसर्गनियमाची जाणीव कवीला आहे. म्हणूनच फुटणारी पालवी आणि गळणारी पाने, सागरास येणारी भरती आणि लाटांचे गाणे, वाऱ्याचे पदलालित्य बघून कवी मोहरून जातो.

'नेत्र लागले नभाकडे त्या, तरी पायाला धूळ
धरतीची ही माया ममता, कधी सुटेना मूळ
मृदगंधासम दर्वळावे हीच मनाला आस
उंच उंच होत चालली आठवणींची रास'

हे सारे क्षणभंगूर आहे याची जाणीव मनाशी पक्की आहे. म्हणूनच की काय, शेवटच्या ओळीत आपल्याला काय होऊन राहायचे आहे हे सांगत कवी आपली भूमिका स्पष्ट करतात. मातीशी इमान किंवा मातीला धरून राहणे हा कवीचा गुणधर्म आहे. हे त्यांच्या व्यवहारातून दिसून येते. समाजामध्ये जे दिसते ते त्यांच्या काव्यात उतरले आहे.




कवीला क्षणभंगूर आयुष्याचा अंत ठाऊक असल्यामुळेच सातत्याने सकारात्मक दृष्टिकोन ठेवणाऱ्या या कवीकडून 'मी जाताना' या कवितेत–

'मी जाताना देऊन जाईन शब्दच लोभसवाणे'

ही इच्छा प्रदर्शित होते.

'स्त्रीरंग' या दुसऱ्या विभागातील सर्व कविता या दुर्गामातेच्या नऊ रूपाप्रमाणे स्त्रीच्या अनेक भूमिकांची ग्वाही देणाऱ्या कवितांनी भारलेल्या आहेत.

या कवितांमधून 'स्त्री'ची विविध रूपांतील महती वर्णन करून आपणांस वाटत असलेली आदरभावना व्यक्त केलेली दिसते. कवितेसारख्या कमी शब्दात व्यक्त होण्याच्या साधनांचा उपयोग, आपल्याला एखाद्याबद्दल वाटणारी भावना व्यक्त करण्यासाठी करणे अशक्य असते. म्हणूनच की काय, इतक्या जास्त प्रमाणात कविता लिहिण्याचे कवीना सुचत असावे. कमलाकर राऊत यांच्या सर्वच कविता या तीन चार कडव्यांच्याच असतात. हे पाहिल्यावर या विधानाला पुष्टी मिळते. आणि म्हणूनच त्यांच्या कवितांतील काही प्रतीके, प्रतिमा या परत परत आलेल्या दिसतात. काही ठिकाणी ओळींमधील साधर्म्य दिसण्याचे ते एक कारण असू शकते. कवी जास्त सकारात्मक आहेत. नाती कोणतीही असली तरी त्यातील फक्त चांगली भावना बघण्याची कवीची दृष्टी आहे.

'वर्षारंग' या विभागात निसर्गातील स्थित्यंतरे वेगवेगळ्या प्रकारे टिपत असतानाच पर्यावरणासाठी आवश्यक असलेल्या परंतु प्रगतीच्या ध्यासापोटी ऱ्हास होत असलेल्या पर्यावरणाला वाचविण्यासाठी 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश देत देत कविता पुढे सरकते.

निसर्ग विविध रंगांची उधळण करीत आपल्या प्रत्ययास येत असतो. ही उधळणदेखील प्रत्येक ऋतूच्या येण्यानुसार होत असते. ही निसर्गातील विविध रूपे त्या, त्या ऋतूंचा साजश्रृंगार करून येतात. ही विविध रूपे, विविध मनःस्थिती श्री. राऊत यांच्या कवितेतून प्रत्ययास येतात. उदाहरणार्थ शिशिर ऋतूच्या येण्याने जी पानगळ दिसू लागते तशी ही कवितादेखील आपला बदललेला मूड घेऊन येते. म्हणूनच ही कविता वसंतातील रंगांची उधळण करीत येते, तर कधी शिशिरातील पानगळीसारखी अंगावर येते. कधी खळखळणाऱ्या झऱ्यासासारखी उंचावरून उडी घेताना दिसते तर कधी वारकऱ्यांच्या अंतरंगातील 'ठेविले अनंते' या वचनात विसावल्यासारखी दिसते.

या कवितासंग्रहतील 'प्रीतरंग' या विभागात कवितांची संख्या अन्य विभागांतील कवितांपेक्षा अधिक आहे. सर्वसामान्यपणे एखाद्या सामान्य माणसाचे आयुष्य माणसाच्या वास्तविक जगण्याकडून आध्यात्मिक जगण्याकडे जात असते. कवी किंवा साहित्यिक या बाबतीत जास्त समृद्ध असतो. 'प्रीतरंग' या विभागातील 'रोज रोज'ही कविता अशा प्रकारची आहे असे वाटायला लागते. त्यातील 'युगानुयुगे तुझा ठाव लागला नाही' या ओळीवरून याची प्रचीती येते. मात्र कवितेचा पुढचा प्रवास प्रस्तुत प्रीतरंग या नामाभिधानाशी साधर्म्य दाखवत पुढे सरकतो.

'तुझिया वदनावरी' या कवितेत..

'तुझ्यासवे तो गंध फुलांचा
रानामधून वाहत जातो
स्पंदनातला ताल अनोखा
श्वासांना या वेढून घेतो'

इथे कवी भावनेच्या एक विलक्षण चरम सीमेवर असतो. या सीमेवरून आता कुठेही जाण्याची इच्छा उरत नाही. अशी अवस्था असताना पुढे..

'तुझी पावले पडता नकळत
वारे जरासे थबकून गेले'

या ओळींमुळे वाचक त्वरित जागेवर येतो. बऱ्याचदा शब्द इतके साधेपणाने अवतरतात की कवितेत ते कविता म्हणून आलेत का? असा प्रश्न पडावा.

'तुझ्या बटेतील' या कवितेत

'तुझ्या बटेतील फूल जुईचे
दरवळले अंतरी
सखे तू इंद्राघरची परी'

या कवितेत आलेला दरवळले हा शब्द विशिष्ट अर्थ घेऊन आला आहे. आज तो दरवळ तिच्या बटेतील फुलातून आलेला आहे असे नव्हे, तर हा दरवळ तिच्या अस्तित्वाने निर्माण झालेला आहे.

'तुझे असणे' आणि 'तुझे ते असणे' यांना वेगळी सूक्ष्म किनार आहे. असणे भास सदृश आहे, तर मग 'ते असणे' आवश्यक आहे का? असा प्रश्न उपस्थित करते. परंतु ते गतकाळातील विशिष्ट आल्हाददायक स्वरूपाचे ते 'असणे' असावे. कदाचित राऊत यांच्या कवितेतील हे मर्मस्थळ असेल. पुढच्याच कवितेत ते पुन्हा लिहितात–

'अवखळ अवखळ आलीस धावत
पावसाच्या सरीपरी
अन् वाऱ्याचा संग करूनी
सळसळली तू धरेवरी'

हे वर्णन एखाद्या अल्लड मुलीचे आहे. तिला पावसाच्या सरीची उपमा देऊन कवीनी आपल्या मनातील रंगीबेरंगी कंगोरे उघड केले आहेत.

पाऊस आणि त्यापासून येणारे सर्व विभ्रम थेंब, ढग, सरी, इंद्र धनू वगैरे सर्व प्रतिमा चपखल बसवलेल्या आहेत. विस्मयचकित करण्यासाठी वापरलेल्या काही प्रतिमा आपला अपेक्षित प्रभाव वाचकाच्या मनावर सोडून जातात. हा प्रभाव या पुस्तकातील प्रत्येक विभागात थोड्याफार प्रमाणात दिसून येतो.

'अस्मिता रंग' या विभागातील 'जय जवान' या कवितेत कवी म्हणतो,

'कणखर बांधा कणखर मन हे
हाती घेऊन प्राण
छातीची ही ढाल करुन
करती जिवाचे रान'

या ओळीतून जवानांच्या तनामनाची अवस्था परिपूर्ण होते, परंतु जवानांच्याप्रती काय आणि किती सांगू या आस्थेमुळे पुढच्या ओळी येतात..

'सोडीती मागे नातेगोते
विसरूनी जाती धाम'

या ओळींमधून, आपले कुटुंब विसरून सीमेवर लढणाऱ्या सैनिकांची परिस्थिती शब्दबद्ध केली आहे.

श्री. राऊत यांनी 'व्यक्तीरंग' या विभागामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर या दोन भारतरत्नांचे व्यक्तिचित्रण काव्यातून केले आहे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

या कवितासंग्रहातील अखेरच्या 'समाज रंग' या विभागात, समाजात कौटुंबिक पातळीवर आणि सामाजिक पातळीवर भेडसावणाऱ्या समस्या आणि काही वाईट प्रवृत्ती यांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

आजची कविता कालमानानुसार बदललेली आहे. विसाव्या शतकातील साठी सत्तरीच्या दशकातील आमची पिढी आज बदललेल्या संस्कृतीमध्ये वावरत आहे. कुटुंबपद्धती, रीतीरिवाज यामध्ये झालेले बदल आजच्या पिढीने स्वीकारलेले आहेत. त्यामुळेच कवितेतही बदल झालेले आहेत. परंतु कमलाकर राऊत यांच्या कवितेतून आजही आमच्या पिढीचे वास्तव पाहायला मिळते. कमलाकर राऊत यांची कविता बदलावर बोलताना दिसत नाही. ही बाब त्यांच्या 'सजले सुखाने', 'माय माऊली',' सौख्यात नांदते मी', 'श्रावणात

पौर्णिमेला' या कविता वाचल्यावर लक्षात येते. याचा अर्थ राऊत यांनी बदल स्वीकारले नाहीत असे नव्हे. आजच्या पिढीला त्या संस्काराचे, संस्कृतीचे, पद्धतीचे, व्यवस्थेचे आकलन व्हावे, शिक्षण व्हावे, स्मरण व्हावे या उदात्त हेतूने ते कविता लिहितात. विशेषत: आजच्या पिढीला वृत्ते, अलंकार याबाबत अनभिज्ञता दिसते म्हणून ते आपल्या कवितेतून वृत्त, अलंकार यांची ओळख करून देण्यात धन्यता मानतात. खरे तर हे मोठे कार्य त्यांनी येथे केलेले आहे.

सभोवतालचा निसर्ग, नद्या, नाले, लाटा, समुद्र, पहाट, संध्याकाळ, नाती–गोती, माय, माय–मराठी, प्रेम, चंद्रसूर्य, समाज, देव–देवता, पाऊस, मृदगंध, पक्षी, वन, अरण्य इत्यादींवर वारेमाप प्रेम करणारा हा कवी, कविता ही शंभरटक्के प्रयत्नांनी लिहिता येते, या विश्वासाबरोबर लय, ताल, सूर पकडता आला पाहिजे, हीच रीत वापरून कविता तयार होते हा आशावाद बाळगून कवी कविता लिहिताना दिसतो आहे. त्यात कवीला यश लाभले आहे. निसर्गाच्या विविधतेचे गारूड कवीच्या मनावर कायम कोरलेले असल्यामुळेच त्यांच्या प्रत्येक कवितेत निसर्ग वेगवेगळ्या स्वरूपात आलेला दिसतो.

एकूणच, या कवितासंग्रहामध्ये जास्तीत जास्त कविता छंदोबद्ध आहेत, यात षडाक्षरी आहे, अष्टाक्षरी आहे, वृत्तबद्ध कविता आहेत, लावणी आहे, पोवाडा आहे, गझलही आहे आणि अक्षर गणवृत्तामधील कविताही आहेत. यातील अनेक कवितांमधून ताल आणि लय सांभाळण्यासाठी आटोकाट प्रयत्न केलेला दिसतो. त्यांच्या अष्टाक्षरी कवितेत आशय आणि अभिव्यक्ती वेगळी असली तरी ही कविता वाचताना बहिणाबाईंची आठवण होते.

कमलाकर राऊत यांच्या कवितेची मुशाफिरी कविता, अभंग, ओवी या कवितेच्या प्रांतातही होत असते. याचाच अर्थ त्यांच्या मनातील आध्यात्मिक घाटदेखील सदैव जागृतावस्थेत कार्यरत असतो.

या कवितासंग्रहाचे मुखपृष्ठ चित्रकार, सुलेखनकार व कवी प्रकाश पाटील यांनी उत्तमरीत्या चितारले आहे. मुखपृष्ठावरील अवकाश, विवर आणि सप्तर्षींचा लक्षवेधी वापर, त्याचबरोबर लेखणीला साहित्याला कवेत घेणारे हात ही संकल्पनाच लक्षणीय आहे. हे मुखपृष्ठ आतील कवितांना साजेशे आहे. कवितासंग्रहाच्या नावाप्रमाणेच स्पृहणीय आहे.

'शारदा प्रकाशन' यांनी या कवितासंग्रहाची उत्तम निर्मिती केली आहे. हा कवितासंग्रह खूपच सुंदर झालेला आहे. विशेष म्हणजे छंदोबद्ध रचना आणि वृत्तबद्धरचना वाचण्याचा आनंद घेण्यासाठी तसेच व काव्याच्या प्रकारांचा आणि काव्यरचनांचा अभ्यास करण्यासाठी आणि आनंद घेण्यासाठी म्हणजेच ज्ञान आणि मनोरंजन या दोन्हींसाठी हा कवितासंग्रह वाचावयास हवा.






# गाढवी सोनार समाज – भाग १

**हा समाज गाढवांवर आपला संसार व सर्व साहित्य घेऊन भटकंती करत होता म्हणून या समाजाला गाढवी सोनार असे म्हणतात. कर्नाटकमध्ये या समाजाला बैलपट्टार या नावाने ओळखले जाते. बैल म्हणजे मोकळी जागा व पट्टार म्हणजे सोनारकाम करणारे. अर्थात गावाच्या बाहेर मोकळ्या जागेवर आपली पाले टाकून जो समाज सोनारासारखी कामे करतो त्याला बैलपट्टार (गाढवी सोनार) असे म्हणतात. हा समाज फिरस्ते समाज आहे. गावागावांत जाऊन अंगठी, जोडवे, दागिने, लोखंडी साखळ्या, बांगड्या, हातातील-पायातील दागिने, नाकातील दागिने व हातातील कडे बनवण्याचे काम हा समाज करीत होता.**

**राहुल चव्हाण**
८१४९२०१२१४

भारतात व महाराष्ट्रामध्ये अशा अनेक जाती-जमाती आहेत की ज्या सांस्कृतिक सामाजिकदृष्ट्या भटक्या विमुक्त आहेत. परंतु अजून तरी त्यांचा समावेश भटक्या विमुक्त सूचीमध्ये झाला नाही. अनेक जातीमधील नागरिक आजसुद्धा ओबीसी किंवा ओपनमधून आपल्या मुलांचे शिक्षण करतात. दादा इदाते आयोग व त्याप्रमाणे अनेक आयोग व अभ्यास समितीने आपल्या अहवालामध्ये अशा समाजाची सूची दिली आहे. परंतु आजपर्यंत या जातींचा भटके विमुक्तमध्ये समावेश झाला नाही. परिस्थिती किती दयनीय आहे हे बघायचे असेल तर अजूनही अनेक जाती मुख्य प्रवाहापासून लांब आहेत, स्वातंत्र्याच्या ८० वर्षांनंतरसुद्धा या जातींकडे लक्ष नाही, तर शासकीयदृष्ट्या या जाती अदृश्य आहेत. अजूनही शासन दरबारी सामाजिक संघटनांकडे, आयोग व समिती यांच्याकडे या जातीची नोंद नाही. अशीच एक जात महाराष्ट्रामध्ये आहे, ती म्हणजे गाढवी सोनार.

राजस्थान आणि उत्तर भारतामधून हा समाज महाराष्ट्रामध्ये स्थलांतरित झाला. या समाजाची भाषा ही ओडिया भाषेसोबत मेळ खाणारी आहे. त्यामुळे हा समाज ओडिसामधून स्थलांतरित झाला असे काही जाणकार सांगतात, परंतु याला सबळ पुरावा मात्र देता येत नाही. आजही हा समाज आपली ओळख महाराणा प्रताप यांच्यासोबत सांगतो. महाराणा प्रताप यांच्या अधिपत्याखालील हा समाज होता. जेव्हा महाराणा प्रताप यांना मेवाड सोडून जंगलात आश्रय घ्यावा लागला तेव्हा या समाजाने महाराणा प्रताप यांच्यासोबत एकनिष्ठता दाखवली. त्यांच्यासोबत जंगलात आश्रय घेऊन राजांच्या आज्ञेवरून युद्धासाठी शस्त्रे निर्माण करण्याचे काम सुरू केले. महाराणा प्रताप यांच्या मृत्यूनंतर हा समाज अनाथ झाला.

अन्नासाठी व निवाऱ्यासाठी भटकू लागला. शस्त्रे बनविण्याची कला अवगत असल्यामुळे या कलेच्या आधारावर गावागावात जाऊन विविध वस्तू बनवण्याचे कार्य हा समाज करू लागला. काळाच्या प्रवाहात या कलेमध्ये परिवर्तन होऊन दागिने, वस्तू बनून देण्याची कला या समाजाने अवगत केली. या समाजाने ब्रिटिशांची गुलामगिरी कधीच स्वीकारली नाही. नेहमी स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न केला व त्यासाठी भटकंती स्वीकारली.

हा समाज गाढवांवर आपला संसार व सर्व साहित्य घेऊन भटकंती करत होता म्हणून या समाजाला गाढवी सोनार असे म्हणतात. कर्नाटकमध्ये या समाजाला बैलपट्टार या नावाने ओळखले जाते. बैल म्हणजे मोकळी जागा व पट्टार म्हणजे सोनारकाम करणारे. अर्थात गावाच्या बाहेर मोकळ्या जागेवर आपली पाले टाकून जो समाज सोनारासारखी कामे करतो त्याला बैलपट्टार (गाढवी सोनार) असे म्हणतात. हा समाज फिरस्ते समाज आहे. गावागावांत जाऊन अंगठी, जोडवे, दागिने, लोखंडी साखळ्या, बांगड्या, हातातील–पायातील दागिने, नाकातील दागिने व हातातील कडे बनवण्याचे काम हा समाज करीत होता. या समाजाला आंध्र प्रदेशमध्ये बैलपट्टार, सोनार आकासलिगा, पंच लोहार, पंचम लोहार म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र, राजस्थान व गुजरात आणि उत्तर भारतात या समाजाला सोनार, स्वर्णकार, अंकोशी, अंकोलवार, मोकलवार, मोकलाजी, सापेनिशी या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्रामध्ये हा समाज केव्हा आला हे नेमके सांगता येत नाही परंतु कर्नाटकमधून हा समाज महाराष्ट्रामध्ये स्थलांतरित झाला हे मात्र निश्चित. कर्नाटकमधील चिकोडी या गावात गुढीपाडव्याला यात्रा भरत होती. कर्नाटक–महाराष्ट्रमधील समाज या यात्रेला चिकोडी या गावात एकत्र येत होता. या यात्रेच्या निमित्ताने महिनाभर तिथे पाल टाकून समाज राहत होता. या काळात लग्न जोडणे, जात पंचायत बसविणे, तंटा– भांडण सोडविणे, घटस्फोट इत्यादी विषयांवर काम चालत असे. या समाजात एकूण सात उपजाती आहेत.

१) रजपूत
२) प्रधान
३) पाचमे
४) सपोद
५) भानजोड
६) अंकोशी
७) मोक्लोद

यापैकी रजपूत व प्रधान या उच्च जाती मानल्या जातात. तर मोक्लोद ही कनिष्ठ जात मानली जाते. त्यांना कोणतेही विधी करण्याचा अधिकार दिला जात नाही. या समाजाचे कुलदैवत भवानीआई (तुळजापूर) व काहींचे महालक्ष्मी (कोल्हापूर) हे आहे. महाराष्ट्रामध्ये हा समाज पुणे शहरात रामटेकडी, हडपसर, फुलेनगर, विश्रांतवाडी, कर्वेनगर, देहू रोड, तर अन्य महाराष्ट्रात सिन्नर, संगमेश्वर, नाशिक, नागपूर, उंबरगाव, वाई, उमरगा, लोनन तसेच बेळगाव, मैसूर, गोवानाका इत्यादी शहरांमध्ये आढळतो. लोनन ही या समाजाची सर्वात मोठी वस्ती आहे.

लग्नविधी– गाढवी सोनार समाजात आजसुद्धा जात पंचायत काही प्रमाणात शिल्लक आहे. आधी मुलीचे लग्न कमी वयात लावण्याची प्रथा होती. परंतु वर्तमानमध्ये काळाप्रमाणे बदल झाला आहे. पूर्वी लग्न लावताना पाच पंचांची उपस्थिती अनिवार्य होती, लग्नात पंचांना मटन व दारू देण्याची पद्धत होती. मुलगी शहाणी झाली की तिला सासरी पाठवण्याची प्रथा होती. गाढवी सोनार समाजात मुलगा मुलीच्या आई–वडिलांना हुंडा देतो. आजसुद्धा दुसऱ्या जातीमध्ये विवाहाला या समाजात मान्यता नाही. तसे केल्यास त्या व्यक्तीला समाजामधून पूर्णपणे बहिष्कृत केले जाते. अनेक वैशिष्ट्यपूर्ण प्रथा–परंपरा घेऊन हा समाज आजच्या काळात संघर्ष करीत आहे.

२०२५ मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा भटके विमुक्त दिवस साजरा करण्याचा आदेश काढला. संपूर्ण समाज शासनाचे आभार व्यक्त करतो. परंतु आजसुद्धा भटके विमुक्त समाज मूलभूत कागदपत्रासाठी संघर्ष करीत आहे. अनेक जाती भटके विमुक्त सूचीमध्ये येण्यासाठी संघर्ष करीत आहेत. आजही गाढवी सोनारसारख्या जातीचा समावेश सरकार दरबारी नाही ही भटके विमुक्त समाजाची शोकांतिका नाही का? ३१ ऑगस्ट भटके विमुक्त दिवस समाजाच्या विकासाचा संकल्प करण्याचा दिवस आहे. शोषित, वंचित, पीडित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचा हा दिवस आहे.

*महाराष्ट्र प्रांत प्रमुख*
*भटके विमुक्त विकास परिषद*




# बंदिशाळा

**अनंतरावांनी गणेशपंतांना बाजूला सारले. आणि ते सरळ आत गेले. खोलीत मंद दिवा तेवत होता. सुमे अंथरुणावर पडली होती. तिच्या केसांच्या बटा कपाळाला चिकटल्या होत्या. ओठ सुकलेले, डोळ्यांभोवती काळी वर्तुळे आणि प्रत्येक श्वासाबरोबर हलणारी तिची कृश छाती... अनंतरावांच्या पायाखालची जमीनच सरकली. 'सुमे!' ते तिच्याजवळ बसले. तिचा हात हातात घेताच त्यांना जाणवले, तिला भयंकर ताप असून तिचा हातही कोमेजला होता. सुमेने कष्टाने डोळे उघडले. ओळखीचा चेहरा दिसताच तिच्या ओठांवर बालपणीचे हसू उमटले.**

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**
९९६७७९६२५४

वाड्याच्या अंगणातला प्रकाश हळूहळू मावळत होता. तुळशी वृंदावनाच्या सावलीने चौक ओलांडला होता आणि घराच्या माजघरात तेलाचा एक छोटासा दिवा काजळी सोडत तेवत होता. दिवसभर तापलेल्या भिंतींतूनही आता गारवा झिरपू लागला होता; पण त्या घराच्या वातावरणात प्रसन्नता नव्हती. अनंतराव धापा टाकत दाराशी आले. प्रवासाचा थकवा जाणवत होता, तर चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसत होती. दाराच्या चौकटीला हात लावून त्यांनी आत डोकावले.

सुमे सुमे गं!

घर शांत होते. फक्त कुठेतरी पाण्याचा थेंब पडल्याचा आवाज येत होता. अनंतरावांनी पुन्हा हाक मारली. यावेळी आतल्या खोलीतून क्षीण कण्हण्याचा स्वर ऐकू आला. ते उंबरठा ओलांडणार, इतक्यात गणेशपंत पुढे झाले. त्यांच्या अंगावर स्वच्छ पांढरे धोतर, खांद्यावर उपरणे आणि कपाळावर ठसठशीत गंध होता. चेहरा मात्र ताणलेला. त्यांनी दार अडवून धरले.

'थांबा, अनंतराव. आत येऊ नका.'

'माझी मुलगी आजारी आहे. तिला पाहायला आलोय.'

'ती आता तुमच्या घरची मुलगी नाही. या घरची सून आहे.'

अनंतरावांनी त्यांच्याकडे अविश्वासाने पाहिले. दाराआडून पुन्हा सुमेचा आवाज आला की काय, असे त्यांना वाटले. 'मला माझ्या मुलीला पाहायचे आहे. तार आली होती

जावईबापूंची. तिची अवस्था फार वाईट आहे.'

'आमचं दिवटं बायकोच्या प्रेमात बुडालंय. इथे धर्म बुडतोय त्याचं काय. गणेशपंतांच्या डोळ्यांत राग होता.'



'गणेशपंत, असा हट्ट नका करू. तिला घरी नेतो. वैद्याला दाखवतो. आमच्या रत्नागिरीत चांगले वैद्य आहेत. बरी झाली मी स्वतः आणून सोडेन.'

'आधी त्या सावरकराचा नाद सोडा. मग उपचारांची भाषा करा. आणि तुम्ही यायची तसदी तर घेऊच नका. तुमच्या अंगालाही तो गलिच्छ वास मारतोय.'

'सावरकरांचा इथे काय संबंध?' अनंतरावांनी विचारलं.

'संबंध नाही? अस्पृश्यांसोबत सहभोजन करता. त्यांच्यासोबत सगळे सण साजरे करता. ते तुमच्या घरात, तुम्ही त्यांच्या दारात. धर्माच्या मर्यादा मोडता आहात तुम्ही. त्या अंदमानच्या कैद्यासाठी तुम्ही हिंदू धर्म सोडून म्लेंच्छ धर्म स्वीकारता काय?'

'पहिली गोष्ट. ज्यांस तुम्ही म्लेंच्छ म्हणता त्याचा स्पर्श तुम्हाला चालतो. पण हिंदू धर्मबांधवांचा स्पर्श चालत नाही? दुसरी गोष्ट, सावरकर कैदी नाहीत, क्रांतिकारक आहेत. देशासाठी त्यांनी आयुष्य होरपळून काढलं आहे. आणि माणसाला माणूस मानणं हा धर्मबुडवेपणा असेल, तर तुम्हाला धर्मच कळला नाही असं म्हणावं लागेल.'

'धर्मात सुधारणा करण्याचा अधिकार तुम्हाला किंवा त्या सावरकरांना दिला कोणी?'

'दुःख पाहणाऱ्या प्रत्येक माणसाला तो अधिकार आहे. जी प्रथा माणसाला अन्नापासून, देवापासून, माणसांपासून दूर करते, तिच्यावर प्रश्न विचारण्याचा अधिकार जन्मतःच आहे.'

आतून सुमेचा क्षीण आवाज आला–'बाबा?'

अनंतरावांनी गणेशपंतांना बाजूला सारले. आणि ते सरळ आत गेले. खोलीत मंद दिवा तेवत होता. सुमे अंथरुणावर पडली होती. तिच्या केसांच्या बटा कपाळाला चिकटल्या होत्या. ओठ सुकलेले, डोळ्यांभोवती काळी वर्तुळे आणि प्रत्येक श्वासाबरोबर हलणारी तिची कृश छाती... अनंतरावांच्या



पायाखालची जमीनच सरकली. 'सुमे!' ते तिच्याजवळ बसले. तिचा हात हातात घेताच त्यांना जाणवले, तिला भयंकर ताप असून तिचा हातही कोमेजला होता. सुमेने कष्टाने डोळे उघडले. ओळखीचा चेहरा दिसताच तिच्या ओठांवर बालपणीचे हसू उमटले.

'बाबा तुम्ही आलात.'

'हो गं. चल, तुला घरी घेऊन जातो.'

'नको.'

'नको म्हणजे?'

तिने हळूच कोपऱ्यात पाहिले. तिचा नवरा तिथे उभा होता. डोळ्यांत पाणी, पण पाय जणू जमिनीला खिळलेले.

'हे माझ्यावर प्रेम करतात, बाबा.' सुमे म्हणाली, 'पण बापासमोर उभं राहण्याइतकं धैर्य नाही.'

तो मान खाली घालून उभा राहिला.

गणेशपंत आत आले. आता पुरे. तिला घेऊन जाण्याचा प्रश्नच नाही. अनंतरावांनी सुमेचे डोके मांडीवर घेतले.

'ही माझी मुलगी आहे.'

'ही माझ्या घरची सून आहे.'

गणेशपंतांनी घरच्या माणसांना इशारा केला. अनंतरावांना बाहेर ओढले जाऊ लागले. सुमेने डोळे उघडण्याचा प्रयत्न केला.

'बाबा...'

'तुला घेऊन गेल्याशिवाय मी शांत बसणार नाही.'

पण गड्यांनी मिळून अनंतरावांना बाहेर काढलेच... दार बंद झाले. अनंतराव अस्वस्थ झाले. काय करावे कळेना. एका क्षणी वाटलं की सोडून द्यावी सावरकरांची साथ आणि घेऊन जावं लेकीला... पण ज्या महायोद्ध्याने आपलं सबंध कुटुंबच क्रांतीच्या होमात स्वाहा केलं होतं, त्या योद्ध्यासाठी एवढं सहन करणं भाग होतं. अनंतराव हतबल होऊन परतू लागले. मग आतून सुमेच्या नवऱ्याची हृदय फाडणारी किंकाळी आली... 'सुमेऽऽऽ!' अनंतरावांच्या काळजात धस्स झालं. त्यांनी जोरजोरात दार ठोठावलं. पण ते उघडलं गेलं नसल्याने त्यांनी खिडकीवर मूठ आपटून खिडकी तोडून आत शिरले.

त्यांनी लाडकी सुमी निश्चल पडली होती. तिच्या चेहऱ्यावरची वेदना नाहीशी झाली होती. जणू दीर्घ यातनेनंतर तिला अखेर माहेरचा रस्ता सापडला होता.

तिचा नवरा तिच्या देहावर कोसळला.

'सुमे, डोळे उघड! मी तुझ्याशिवाय नाही जगू शकत गं ऐकतेस ना?'

अनंतरावांनी तिच्या कपाळावर हात ठेवला. ताप उतरला होता. पण श्वास थांबला होता.

'माझी लेक... माझी चिमणी, माझी सुमी...' एवढेच शब्द त्यांच्या ओठांतून निघाले. तुला घेऊन जायला मला उशीर झाला.

दाराशी उभे असलेले गणेशपंत निश्चल झाले. बाहेर अंधार पसरला होता. आणि अनंतरावांचं आयुष्यही अंधकारमय झालं होतं... सावरकरांसोबत सहभोजनादी उपक्रमात सहभाग घेतल्याने अनेकांना यातना सोसाव्या लागल्या होत्या. सहभोजनाच्या कार्यक्रमातून एखादा तरुण आला की त्याचे घरचे लोक त्याला आंघोळ घालत आणि शुद्ध करून घेत. आंघोळ केल्याशिवाय घरात घेत नसत. सततचे टोमणे तर सुरूच राही. सावरकरांच्या सुधारणावादी चळवळीतील कुणी माणूस आजारी पडला तर देवाचा कोप झाला म्हणून लोक हिणवत. मात्र अनेक सुधारणावादी मंडळी सावरकरांच्या कार्याने आश्चर्यचकित होत होती. ज्यांना कोकणचे गांधी म्हटलं जायचं, ते गांधीवादी अप्पासाहेब पटवर्धन 'सत्यशोधक'च्या (३० मे १९२५) अंकात लिहितात, 'काही वर्षांपूर्वी रत्नागिरीत अस्पृश्यता निर्मूलन हा विषय केवळ बुद्धिवाद्यांचा चर्चेपुरता आणि त्याविरुद्ध लेख लिहिण्याइतकाच मर्यादित होता, पण रत्नागिरीत येताच सावरकरांनी शिवाजी जयंतीच्या प्रसंगी याविरुद्ध प्रकटपणे बोलायचे धाडस तर केलेच; पण आपल्या बोलण्याप्रमाणे ते वागलेदेखील. त्यांनी मला या अस्पृश्यता निर्मूलन कार्यात झोकून देण्यास सांगितले. ही कल्पना संघटितरीत्या प्रत्यक्षात उतरविण्याचे श्रेय केवळ सावरकरांचे आहे.

(क्रमशः)







# ललित लेखनाचा नितळ डोह


**श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललित लेखनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नितळ संवेदनशीलता हे होय. चित्रात्मकता, लयबद्धता आणि आशयघनता हा त्यांच्या ललित लेखनाचा स्वभावधर्म आहे. नदीच्या काठावर कसलीही पेरणी नसताना हिरव्यागार गवताने जन्मास यावे आणि नितळ पाण्यात डोकावून पाहवे इतक्या सहजपणे त्यांचे ललित लेखन रुजून आले आहे असे दिसते. त्यांचे ललित लेखन वाचत असताना आपण त्या प्रदेशात त्या वातावरणात इतके समरस होऊन जातो, की कधी वानराच्या फौजा आपल्या आसपास खेळत आहेत किंवा डोहापलीकडे असलेला निसर्ग सजीव होऊन आपल्याला साद घालत आहे असा प्रत्यय कुलकर्णी यांचे लेखन वाचीत असताना येत राहतो.**

**किरण शिवहर डोंगरदिवे**
७५८८५६५५७६

मराठीतील ललित लेखनाची पारंपरिक चौकट तोडून ललित लेखनामध्ये कथात्मक संदर्भ पेरण्याची आणि कवितेच्या लयबद्धतेने त्यातील नजाकत सजीव करण्याची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती श्रीवि यांच्या 'डोह' या ललित संग्रहामुळे. ललित लेखनाचा डोह किती खोल आणि नितळ आणि निर्मळ असू शकतो याची जाणीव मराठी साहित्याला त्यांच्या ललित लेखनामुळे झाली. श्रीनिवास विनायक कुलकर्णी ऊर्फ 'श्रीवि' यांचा जन्म २० नोव्हेंबर १९३६ रोजी सांगली जिल्ह्यातील औदुंबर या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या जन्मगावी, तर सातवीपर्यंतचे शिक्षण अंकल–खोप येथे झाले. त्यांचे आजोबा व वडील दोघेही चित्रकार असल्यामुळे उत्तम आणि सूक्ष्म निरक्षण शक्ती आणि कलात्मकता ही त्यांच्या रक्तातच होती असे म्हणावे लागेल. शिक्षण सुरू असताना इयत्ता चौथीत असताना त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. ती 'बालसन्मित्र' या नियतकालिकात प्रकाशितही झाली होती. शिक्षण संपल्यावर त्यांनीही आपल्या आजोबा आणि वडिलांप्रमाणे चित्रकला आणि पेंटिंगचा वारसा पुढे चालवण्याच्या दृष्टीने साइन बोर्ड पेंटिंगचा व्यवसाय करायला प्राधान्य दिले. मात्र लवकरच ओगलेवाडी येथील काच कारखान्यात त्यांनी नोकरी केली. या दरम्यान त्यांचे कविता लेखन सुरू होते. वेगवेगळ्या नियतकालिकांत त्यांच्या कविता प्रकाशित होत होत्या. पुढे त्यांनी कविता लेखन जवळजवळ थांबवले किंवा असे म्हणता येईल की, कवितेमध्ये व्यक्त होण्यावर शब्दांची बंधने




येत असल्याच्या जाणिवेतून त्यांनी गद्यालाच काव्यात्मक रूपात मांडण्याचा प्रयत्न करत ललित लेखनाला प्राधान्य दिले. निसर्ग आणि भोवताल यांचे सूक्ष्म निरीक्षण वडिलांच्या सान्निध्यातच लाभलेले असल्यामुळे आपल्या लिखाणातूनही त्यांनी त्या सूक्ष्म टिपणाच्या नोंदी उमटवून रसिकांच्या मनाचा ठाव घेतला आहे.

मराठी साहित्यातील मापदंड म्हणून ओळखला जाणारा वार्षिक साहित्य अंक म्हणजे 'मौज.' 'मौज' नियतकालिकाचे संपादक म्हणून श्रीनिवास कुलकर्णी यांनी काम केले. मात्र श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांची खरी ओळख आहे, ती ललित लेखक म्हणून. १९६० मध्ये 'सत्यकथेत मनातल्या उन्हात' हा ललित लेख प्रसिद्ध झाला. येथून पुढे त्यांचा ललित लेखनाचा प्रवास सुरू झाला. ललित लेखनाला नवा आयाम देणारा त्यांचा ललित संग्रह 'डोह' १९६५ मध्ये प्रकाशित झाला. इरावती कर्वे यांच्या 'ऋतुचक्र'मध्ये आपण जो निसर्गाचा सोहळा अनुभवला त्याच्या पल्याड जाऊन बालपण, ग्रामीण जीवन तेथील माणसे, तो सभोवताल, तेथील निसर्ग, झाडे, पाणी एखाद्या चित्रकाराच्या चित्रातून सजीव व्हावे त्या पद्धतीने त्यांनी शब्दातून जिवंत केले आहे. शांता शेळके 'डोहा'बाबत म्हणतात त्याप्रमाणे, ललित लेखाचे बंदिस्त आणि सांकेतिक स्वरूप ज्या समर्थ लेखकांनी बदलले आणि ललित लेखनाच्या विकासाची वाट मोकळी करून दिली त्याची सुरुवात 'डोह'पासून झालेली आहे.

'सोन्याचा पिंपळ' हा १९७५ मध्ये आलेला ललित संग्रह म्हणजे अनुभवाला आणि अनुभूतीला जे जे गवसले त्याला कसलीही मुरड न घालता शब्दरूपात साकार करण्याचा निर्मळ आणि नितळ प्रयत्न होय. ललित लेखनामध्ये अधिकाधिक काव्यत्मकता आणि कथात्मकता यांचा समन्वय साधत आशयदृष्टीने अधिकाधिक समृद्ध असे ललित लेखन श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललित लेखनाच्या साधनेतून निर्माण होऊ लागले, त्यात 'पाण्याचे पंख' आणि 'कोरडी भिक्षा' यांचाही समावेश होतो.

श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललित लेखनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे नितळ संवेदनशीलता हे होय. चित्रात्मकता, लयबद्धता आणि आशयघनता हा त्यांच्या ललित लेखनाचा स्वभावधर्म आहे. नदीच्या काठावर कसलीही पेरणी नसताना हिरव्यागार गवताने जन्मास यावे आणि नितळ पाण्यात डोकावून पाहवे इतक्या सहजपणे आणि स्वाभाविकपणे त्यांचे ललित लेखन रुजून आले आहे असे दिसते. त्यांचे ललित लेखन वाचत असताना आपण त्या प्रदेशात त्या वातावरणात इतके समरस होऊन जातो, की कधी वानराच्या फौजा आपल्या आसपास खेळत आहेत किंवा डोहापलीकडे असलेला निसर्ग सजीव होऊन आपल्याला साद घालत आहे, नदीकाठावर गेल्यावर सुसरीचे दिवस आठवत की आपसूकच पाण्यातून बाहेर पडावे वाटणार... असा उत्कट प्रत्यय कुलकर्णी यांचे लेखन वाचीत असताना सतत येत राहतो.

कविवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात, तरल इंद्रियसंवेदना असोत किंवा मनाच्या कोमल हालचाली असोत, त्यांचे आविष्कृत प्रतिबिंब त्यांच्या या लेखनात विस्मयाचा अनुभव देत उमटत राहते. खोल समजूतदारपणातून येणारी नम्रता



लेखकाच्या अनुभवविश्वात भरून राहिली आहे. त्यामुळे, काहीतरी विशेष मोलाचे सांगण्याचा आविर्भाव कुठेही नसलेले हे लेखन खूप काही सांगून जाते. हळुवार काव्यात्मता या लेखनात इतकी अंगभूत आहे की, भाषा ‘काव्यमय’ करण्याचा जराही प्रयत्न कुठे जाणवत नाही. भाषेशी कुठेही प्रयोगशील झोंबी न घेता, नुकत्या उगवलेल्या पानासारखे सतेज कोवळे नावीन्य प्रकट करणारे लेखन क्वचितच आढळते. हा बिकट योग श्रीनिवास कुलकर्णी यांना उत्स्फूर्तपणे साधला आहे. निर्मळ पाणी किंवा चांदणे ‘असते’ तसेच, अगदी तितक्याच मूलभूत सहजपणे, श्रीनिवास कुलकर्णी यांचे हे लेखन ‘असते.’ बालकवींच्या प्रतिभेने कविता न लिहिता जर गद्य लिहिले असते, तर ते लेखन श्रीनिवास कुलकर्णी यांचेच लेखन झाले असते, असे मला अनेकदा वाटले आहे.

श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना महाराष्ट्र शासनाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार मिळाला आहे. पुरस्कार ही साहित्य श्रेष्ठत्वाचा मानदंड कधीच नव्हता आणि नसतो. त्यातही श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांसारख्या प्रसिद्धी-पराङ्मुख व्यक्तिमत्त्वाला पुरस्काराची कवचकुंडले नकोच असतात हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मात्र खऱ्या अर्थाने अजरामर साहित्यकृती निर्माण करणारे जे साहित्यिक महाराष्ट्रामध्ये होऊन गेले त्यात श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

---

# राज्यस्तरीय अक्षर गौरव साहित्य विशेष पुरस्कार ‘गिरीश प्रभुणे जसे कळले तसे’ या पुस्तकाला




सातारा येथील अश्वमेध ग्रंथालय व वाचनालयाच्या वतीने गेली १४ वर्षे अक्षर गौरव साहित्य पुरस्कार देण्यात येतात. कै. भास्करराव ग. माने स्मृत्यर्थ दिला जाणाऱ्या या पुस्कारात यावर्षीच्या पुरस्कारामध्ये रवींद्र गोळे यांनी लिहिलेल्या ‘गिरीश प्रभुणे जसे कळले तसे’ या पुस्तकाचा समावेश करण्यात आला होता. हा पुरस्कार २३ ऑगस्ट रोजी ज्योत्स्ना चांदगुडे (ज्येष्ठ कवियत्री) यांच्या हस्ते व धनंजय तडवळकर (कवी गझलकार) यांच्या प्रमुख उपस्थित प्रदान करण्यात आला. यावेळी चंद्रकांत पोतदार, दिवाकर आचार्य, बा. बा. कोटंबे, प्रविण बोकुलकर, जे. डी. पराडकर, रवींद्र बोडकीहाळ, अश्विनी कोंठावळे, अशोक शिंदे, श्रीमंतीने निलकर, वासंती घाडगे, साक्षी महामुलकर, जयराम धोंडगे इत्यादींच्या साहित्यकृतींनाही पुरस्कर देवून गौरविण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन डॉ. राजेंद्र माने अध्यक्ष अश्वमेध ग्रंथालय व वाचनालय तसेच रवींद्र भारती संस्थापक अश्वमेध ग्रंथालय व वाचनालय यांनी केले होते.